डॉ. सुहास पेठे

शिदोरी

।। श्री ।।

शिदोरी

(व्यक्तिगत, सामाजिक व पारमार्थिक हितासाठी विचारमंथन)

डॉ. सुहास पेठे

एम्.ए., पीएच्.डी. (तत्त्वज्ञान)

* शिदोरी *

पुस्तकरूपाने प्रकाशित दुसरी आवृत्ती : जुलै २०१४
डिजिटल आवृत्ती : डिसेंबर २०२१

© डॉ. सुहास पेठे , सातारा, महाराष्ट्र

डॉ. सुहास पेठे यांच्या अन्य साहित्यासाठी पहा :

वेबसाईट : www.pethekaka.com

युट्यूब चॅनेल : Shri Pethe Kaka

अँड्रॉईड ॲप : SadhanNandadeep (साधननंदादीप)

*

वाचकांच्या हाती
ही छोटीशी वैचारिक शिदोरी
नम्रतापूर्वक अर्पण -

- सुहास पेठे

अनुक्रमणिका

जीवनप्रवासासाठी शिदोरी	..	५
१. आमिषांतून मुक्तता	..	७
२. बहिरंगाचं अतिक्रमण	..	९
३. उच्च उद्दिष्टांचे उपयोग	..	११
४. समाजशील की सुखशील ?	..	१३
५. भावंडांची जबाबदारी	..	१५
६. आपली भूमिका	..	१७
७. कष्टांची किमया	..	२०
८. यात्रांचा पुनर्विचार	..	२१
९. तपोभूमी की पर्यटनस्थळ ?	..	२३
१०. क्षेत्रं : शांतिस्थान	..	२५
११. परिस्थितीवर मात	..	२७

१२. डोळस प्रवास .. २९
१३. जबाबदारी जगवण्याचीही .. ३१
१४. अश्रूंचं मोल .. ३३
१५. आत्मविश्वासाचं गमक .. ३५
१६. आत्मविश्वासाकडं वाटचाल .. ३७
१७. मुंगी हा गुरू .. ३९
१८. 'गुरु'किल्ली .. ४१
१९. प्रथांचा पुनर्विचार .. ४४
२०. मर्यादांची ओळख .. ४५
२१. विकासाचं गणित .. ४७
२२. आंतरिक विकासाचं वेगळेपण .. ४९
२३. निर्जिवाची मात .. ५१
२४. 'स्व' च्या ओळखीचा उपयोग .. ५३
२५. दुःखाच्या सोबतीचा स्वीकार .. ५५
२६. पूर्णतेच्या प्रयत्नांची मर्यादा .. ५७
२७. स्वप्न : उपयोग व उपद्रव .. ५९
२८. भेद : ओळख व स्थान .. ६१
२९. निसर्गाचा एक न्याय .. ६३
३०. अंतरं : वास्तव व उपाय .. ६५
३१. बदल : सुख आणि दुःख .. ६७
३२. भविष्याची चाहूल .. ६९

*

जीवनप्रवासासाठी शिदोरी

माणसाच्या जीवनाला हजारो वर्षांचा इतिहास आहे. काळाच्या असंख्य चढ–उतारात कितीतरी गोष्टी बदलत गेल्या. राहणीमान, सुखसोयी यांतले बदल लक्षणीयच आहेत. आपापल्या साठ–सत्तर वर्षांच्या आयुष्यातसुद्धा अनेक बदल घडत असलेले आपण पाहतो.

या सगळ्यात ज्या काही गोष्टी कायम आहेत, त्यांत जसा भौगोलिक प्रवास कायम आहे, मनुष्य या ना त्या निमित्तानं या गावाहून त्या गावाला प्रवास करतो आहे, तसाच त्याचात्याचा एक जीवनप्रवासही सुरू आहे. निसर्गाकडून शरीराचा, वयाचा आणि समजुतींनी, विचारांनी, कल्पनांनी – अंतरंगाचा !

पूर्वी प्रवासात हॉटेल, खाण्यापिण्याच्या सुविधा यांचा अभाव असताना त्याला घरून त्याच्या गावी पोचेपर्यंत लागणाऱ्या अन्नाची शिदोरी बरोबर घ्यावी लागत असे. आजही थोड्या प्रमाणात काहींना त्याची गरज आहे, काहींना आवड आहे.

जीवनाच्या प्रवासात मात्र अंतरंगासाठी जी शिदोरी लागते ती विचारांची, कल्पनेची. तिची गरज तेव्हाही होती आणि आजही आहे. येणारे अनुभव, भेटणारी माणसं, घडणाऱ्या घटना, समोर येणारी परिस्थिती, पुढच्या काळाची चाहूल, त्यासाठी योजना – हे सारं विधायक व्हावं म्हणून या वैचारिक शिदोरीची निदान सामान्य माणसाला गरज लागते. ती नसली, तर अकारण त्याचा गोंधळ होतो, चुकीचे प्रतिसाद, निर्णय घडतात आणि मुख्य जातं ते स्वास्थ्य !

शिदोरी बरोबर घेऊन जाणारा जसा भुकेनुरूप जेवू शकतो, उपाशी राहात नाही, अडचण येत नाही, तसाच विधायक आणि पुरेशी वैचारिक शिदोरी बरोबर असणारा बदलणाऱ्या काळाप्रमाणं, वयाप्रमाणं येणाऱ्या प्रसंगांना योग्य पद्धतीनं सामोरं जाऊन स्वतःचं आणि इतरांचं स्वास्थ्य टिकवू शकतो. त्या दिशेनंच आजच्या काळाला धरून विविध विषयांबद्दलच्या दिशा समोर ठेवणारी ही एक शिदोरी आहे. पटेल–रुचेल ते घ्यावं, उपयोग करावा, न रुचेल ते सोडावं या नम्र विनंतीसह दिलेली !

सामान्य माणसांच्या शिदोरीत भाकरीच्या चार चतकोरांना मोठं स्थान आहे. या परंपरेचा आणि या पुस्तकातल्या पोथीच्या व चार कॉलमच्या मांडणीचा जिव्हाळ्याचा धागा आहे. तीच गोष्ट मुखपृष्ठाच्या संकल्पनेची आहे. वर खाली होणाऱ्या, अविरत पुढं जात राहणाऱ्या काळाच्या लाटा दोन रेषांनी सूचित होतात. त्या त्या काळानुसार, काही बदलणाऱ्या काळाला धरून, तर काही शाश्वत विचार देणाऱ्या शिदोऱ्या पूर्वीपासून या काळाच्या ओघात येत आहेत, पुढंही निरंतर येत राहतील. त्यातल्याच आजच्या काळाच्या लाटेवरची ही एक छोटीशी शिदोरी !

ती आकाराला येण्यात मौलिक मदत करणारे मुद्रक श्री. संदेशजी, वितरणाची सेवा करणारे श्री. प्रकाश व श्री. चैतन्य फुले, मुखपृष्ठ व अक्षरजुळणी सांभाळणारे साधक – कार्यकर्ते या सर्वांचा मी मनःपूर्वक ऋणी आहे.

संतनगरी, सातारा **– सुहास पेठे**

१. आमिषांतून मुक्तता

मूल लहान असतं. त्यामुळं गोष्ट हिताची असली तरी, ती जर कष्टाची असेल तर, ती गोष्ट करणं ते मूल टाळतं. अभ्यासानं त्याचंच हित होणार असलं तरी, त्यातले कष्ट त्याला नको वाटतात. म्हणून ते मूल अभ्यासाची टाळाटाळ करतं. तेच व्यायाम, मोठ्यांचं ऐकणं, एखादी कला शिकणं, साधं शांत बसणं, पाठांतर करणं - अशा अनेक गोष्टी मुलांना कष्टामुळं, चांगल्या असूनही, नकोशा वाटतात.

हे सारं आपण अनुभवलेलं असेल. यात मार्गही काढले असतील. यांत बरेच वेळा काढला जाणारा एक मार्ग म्हणजे निरनिराळी आमिषं! 'तू अभ्यास केलास, तर तुला बागेत घेऊन जाईन, आइस्क्रीम देईन, चांगला आवडीचा पदार्थ खायला करून घालीन.' इथंपासून जे आमिषांचे प्रकार सुरू होतात ते मुलं मोठी होत जातील तसे मुलांच्या आकलनाप्रमाणं आणि पालकांच्या त्याला बळी पडण्याप्रमाणं, वाढत जातात. गप्प बसायला चॉकलेट, पूजा केली तर टॉफी, शाळा न बुडवली तर क्रिकेटची बॅट, दोन तास अभ्यास केल्यावर एक तास कार्टून-सीरियल -सिनेमा बघण्याची परवानगी-अशी सुरू झालेली आमिषांची मालिका एखादी सीरियल बावन्न भागांसाठी सुरू व्हावी आणि पाचशेवीस भाग चालावी तशी सुरू राहते.

त्यात मागण्यांचं स्वरूपही साध्या

चॉकलेटपासून थेट पैशापर्यंत कसलंही रूप धारण करू शकतं. कामाची शाबासकी देणं वेगळं आणि शाबासकी देणार असाल तर काम करतो म्हणणं वेगळं ! त्यातही अमुक शाबासकी मिळणार असेल तर तमुक काम करीन, हे वेगळं आणि त्याही पुढं जाऊन अमुक अमुक गोष्ट मिळणार नसेल तर काम करणार नाही, हे त्याहूनही वेगळं ! चांगल्या कामाचं वळण लागावं म्हणून कौतुकानं सुरू होणाऱ्या या गोष्टींबद्दल सावधान राहिलं नाही तर, मुलांच्या मनाला चांगलं वळण लावण्याऐवजी आमिषांच्या गुलामीनं काम करण्याचं उलट एक वाईट वळण आपण नकळत लावीत असतो. याकडं वेळीच लक्ष गेलं नाही, तर आयुष्याच्या शेवटी सांभाळण्यासाठीसुद्धा इस्टेटीचं आमिष दाखवण्याची दुर्दैवी वेळ येते. त्यावेळी हा प्रकार अंतरंगाला एखाद्या खंडणीचं विघातक वळण लावीत असतो, हे लक्षात घ्यावं.

एखादी हिताची किंवा चांगली गोष्ट करण्याचे फायदे लक्षात येऊ शकतील, इतकं वय होताच, वेळीच ही आमिषं आवरती घेऊन मुलांना चांगलं काम, कर्तव्य करण्याची गरज, ओढ आणि निर्धार निर्माण करणं, हे जवळच्यांचं निकडीचं कर्तव्य आहे. ते केलं तर, उद्याचे हे नागरिक या आमिषांच्या गुलामगिरीतून सुटतील आणि समर्थपणे व निरपेक्षपणे आपलं कर्तव्य करू शकतील, जे कितीतरी गरजेचं आहे !

*

२. बहिरंगाचं अतिक्रमण

माणूस अंतरंगानं आणि परिस्थितीनंही वेगवेगळा असतो. रंग, उंची, शरीराच्या ठेवणी - असे भेद वरवरचे असतात. तो राहतो त्या घरापासून परिसरापर्यंत परिस्थितीही खूप वेगवेगळी असते. याहीपेक्षा पुढं जाऊन विचार केला तर, आढळतं ते त्याच्या अंतरंगातलं वेगळेपण. त्यात प्रेमळपणा, रागीटपणा, जिद्द, क्षमता, अस्वस्थता, काळजीचे स्वभाव, कोरडेपणा, निष्काळजीपणा - असे असंख्य प्रकार या अंतरंगात दिसतात.

हे लक्षात घ्यावं की, अंतरंगावर बहिरंगाचेही परिणाम होत असतात.शरीराची ठेवण, परिस्थितीतले फरक यांच्यामुळं त्याच्या अंतरंगावर काही परिणाम नकळत होत जातात. स्वभाव बनत जातात.

आपण एक गोष्ट सहज पाहू. निसर्गानं एखाद्याला ठेवणीनं थोडी उंची कमी दिली असली तर, इतरांकडं पाहून त्याला त्याच्या शरीराच्या ठेवणीतला फरक हळूहळू लक्षात येतो. कधी कुणी तो मुद्दाम लक्षात आणून देतो. मग त्याला वाटतं आपण उंचीनं कमी आहोत किंवा दिसायला इतरांच्या मानानं कमी पडतो आहोत.

खरंतर, या वस्तुस्थितीनं वातावरणात किंवा अंतरंगात काही मोठा फरक पडण्याचं कारण नाही. पण इतरांच्या बरोबरीला शारीरिकदृष्ट्या कमी पडण्याचा

परिणाम त्याच्या अंतरंगावर नकळत होतो. बऱ्याच जणांना त्यातून न्यूनगंडाची भावना निर्माण होते. तिचा परिणाम त्यांच्या अंतरंगातल्या विचारांवर, मतांवर, प्रवृत्तींवर होतो. तो अनेकदा नकारात्मक असतो.

म्हणजे असं की, बहुसंख्य लोकांनी एखादी गोष्ट करायची ठरवली असेल तर, आपण आधीच नगण्य आहोत अशी भावना मनात असल्यामुळं त्या सर्वांच्या मताला आपण विरोध करावा, आपलं काही वेगळं मत मांडावं असं अशा व्यक्तींना वाटू लागतं. त्यामुळं आपल्या व्यक्तिमत्वाची दखल घेतली जाईल, असं त्यांना आतून नकळत वाटत असतं. बाह्य ठेवणीचं आपल्या अंतरंगावर अकारण नकळत अतिक्रमण होतं, ते असं.

अर्थात, अशा वेगळेपणात, मतांत काही तथ्य असेल तर गोष्ट वेगळी. पण ते जर केवळ स्वतःच्या शारीरिक कमतरतांची भरपाई करण्यातून आणि त्यातून आपलं महत्त्व प्रस्थापित करण्यातून आलं असेल, तर ते गरजेचं नसतं.

हेच कदाचित बहिरंगानं उंच, गोऱ्या व म्हणून स्वतःचं श्रेष्ठत्व गृहीत धरणाऱ्यांचं, ते इतरांवर लादणाऱ्यांचंही होईल. बहिरंगाची अशी अतिक्रमणं अनावश्यक, हानिकारक आहेत. अशा कुठल्या बाह्य गोष्टींचे अनावश्यक प्रभाव आपल्या अंतरंगावर पडत नाहीत ना ?

*

३. उच्च उद्दिष्टांचे उपयोग

दुधाला विरजण लावून काही काळ शांत ठेवलं की, दही होतं. थोडं पाणी घालून घुसळलं की, ताक. तिथंच थांबलं तर ताकच. आपला उद्देश मुळात ताक करणं किंवा पिणं एवढाच असेल तर, एवढ्यावर काम संपतं. पण ज्याचा उद्देश त्यातून लोणी काढणं हा असेल तर त्याला नुसतं दह्यात पाणी घालून ढवळण्यावर थांबता येत नाही. अधिक घुसळण्याचे कष्ट घ्यावे लागतात. अर्थात ज्याचा उद्देश पुढं तूप करणं हा असेल तर, त्याला ते लोणी कढवण्याचे कष्ट घ्यावे लागतात. मग तूप तयार होतं. तो मात्र शुद्धात शुद्ध पदार्थ आहे. ते दुधाचं सार्थक आहे.

आपल्या आयुष्याचं असंच आहे. प्रत्येकाला हे आयुष्याचं दूध वाट्याला आलंच आहे. सततच्या कर्मांनी त्याला विरजण लागणारच आहे. आपलं लक्ष असो नसो. कुणी म्हणाला तरी, आयुष्याचं शुद्ध दूध पिणं कुणाला शक्य नाही. आधीच्याच वृत्ती-प्रवृत्ती, कर्मांकडचे-धडपडीचे कल, गरजा यामुळं दही तर होणारच आहे. त्यात संबंध नि घटना यांचं पाणी मिसळलंही जाणार. आपण सावध असलो तर, दही गोड, मध्यम आंबट, इतपत घडेल. अजिबात बेसावध असलो तर मात्र फेकून द्यावं लागेल इतकं आंबट ताक त्यातून निर्माण होईल. निरुद्देश्य, दिशाहीन, आळशी, कुकर्मी जीवन त्यातून घडेल.गुन्हेगार, दहशतवादी, उपद्रवी

लोकांचे शेवट व्हावे, तशी ही आयुष्यं समाजाला फेकून द्यावी लागतात.

निदान लोणी मिळवण्याइतपत उद्दिष्ट असलं तर, दुधाचा नि विरजणाचा योग्य लाभ घेऊन मंथन करावं. असे सावध, कर्तृत्ववान लोक स्वतःच्या आयुष्यात हित साधून देणाऱ्या गोष्टी मिळवतात. तसंच ते समाजाला उत्तम कार्यं, सेवा, सत्कर्मं, सांस्कृतिक भर, संशोधनं - अशा असंख्य प्रकारच्या देणग्या देऊन जातात. ते मोठं उद्दिष्ट आहे म्हणून. त्यासाठी आयुष्यात येणारे अनुभव, शिवाय जाणीवपूर्वक केलेला अभ्यास, मुद्दाम घेतलेले अनुभव आणि कर्मं-अशी उच्च, विधायक उद्दिष्टं आहेत-म्हणून हे घडू शकतं.

काही लोक पुढचं उद्दिष्ट गाठतात. लोण्याला जशी अधिक आच द्यावी लागते, तशी ही कठीण असलेली आच म्हणजे कर्तृत्वाचा कुठला अभिमान न बाळगणं, चित्त मोकळं ठेवणं, भगवंताच्या कृपेची जाणीव ठेवणं, नित्य आनंदात आणि निर्याणाच्या तयारीत असणं-अशा साऱ्यांची ती आच आहे. ती लागली तर ती माणसं शुद्ध तुपासारखी शुद्ध, समाधानी होऊन, मुक्त होऊन जातील, हे सांगायला नकोच.

पण आपल्या आयुष्याचं असं विचारपूर्वक सार्थक करण्यासाठी निदान आपल्या कुवतीप्रमाणं उच्च उद्दिष्ट ठरवण्याची तयारी हवी ना ?

*

४. समाजशील की सुखशील ?

शेकडो वर्षं माणसाची व्याख्या समाजशील प्राणी म्हणून केली गेली आहे. तसे इतर अनेक प्राणीसुद्धा मुळात कळप करून राहतात. याचा अर्थ, त्या अर्थानं, तेही समाजशील आहेत, असं म्हणता येतं. पण प्राणी म्हणून प्रगत असलेल्या माणसाची मर्यादा केवळ अशी कळप करून राहण्यापुरती मर्यादित नाही आणि नसावीही.

इतर प्राणी जे कळप करून राहतात, त्यांना इतर बांधवांची ओढ असली तरी जाणीव असेलच असं नाही. त्यांची एकत्र राहण्याची कारणं एकत्रित शिकार करणं, आपल्यावर हल्ला झाल्यास समूहानं प्रतिकार करता येणं- अशा स्वरूपाची आहेत. त्यात बरोबरच्या इतरांच्या हिताचा, अडचणींचा, उणिवांचा सहानुभूतीनं विचार करणं, दुसऱ्याबद्दल करुणा - कणव - प्रेम वाटणं, त्यातून एकमेकांना मदत करणं - अशा भावना क्वचित दिसतील. माणसाच्या बाबतीत या भावना दिसतातच पण वेळी स्वतः त्रास, गैरसोय सोसून, स्वार्थापलीकडं जाण्याची क्षमता आढळते. माणसाची समाजशीलता ही अधिक व्यापक आहे.

तर अनेकजण यापलीकडं जाऊन इतरांच्या कल्याणासाठी उद्‌बोधन, विचारप्रणाली, संशोधनं, वेगवेगळ्या सामाजिक संस्था - संघटना यांच्या निर्मितीसाठीसुद्धा आयुष्य, मालमत्ता, पैसा

खर्ची घालतात. अशा माणसांना खरं समाजशील म्हणता येईल, पण अशी माणसं किती ? तर अपवादभूतच.

उलट याचीच दुसरी दुर्दैवी बाजू जास्तच अनुभवायला येते, हे आपल्या लक्षात आलं असेल. वास्तविक, जन्मापासून मृत्यूपर्यंत व मृत्यूनंतरही समाजाशिवाय त्याचं चालत नाही, हे सत्य आहे. असं असूनही जरा पंख फुटले, थोडी ताकद वाढली, आर्थिक सुबत्ता आली शारीरिक क्षमता असली की, मनुष्य कितपत समाजशील राहू शकतो ? मनासारखा न वागणारा - भले तो नात्यानं, नोकरीउद्योगानं जवळचा असला तरी, नकोसा होतो, टाळावासा वाटतो. संकटात सापडलेल्याचा किंवा बदनामी झालेल्याचा संपर्क नकोसा होतो, वृद्धांचे आश्रम निघतात, परस्वाधीन किंवा दुर्धर आजारात सापडलेला माणूस टाळावासा वाटतो. म्हातारं, दुर्बळ माणूस नकोसं होतं. इतकंच काय, स्वतःच्या सुखासाठी आपल्यासारख्याच इतर माणसांचा बळी घेण्याच्या कित्येक घटना आज अनुभवायला येत असतात.

तसं असेल तर आपली समाजशीलता प्राण्यांएवढीच झाली ! मग हा प्रश्न स्वतःला विचारण्याची गरज आहे की, माणूस म्हणून आपण खरे समाजशील कधी होऊ ?

*

५. भावंडांची जबाबदारी

एकत्र कुटुंब आता हळूहळू विघटित होत चालली आहेत. त्याची नफा-नुकसानं काय असतील ती कळतीलच. एक गोष्ट मात्र त्यात होती आणि ती आज आणि पुढंही राहणार. ती म्हणजे लहान भावंडांच्या जबाबदारीची जाणीव. कुटुंबपद्धतीत ही जबाबदारीची जाणीव आपोआप विकसित होत होती. आता तिच्यावर मुद्दाम विचार करावा लागेल. कारण इथं अपेक्षित जबाबदारी ही नुसत्या लौकिक कुटुंबातली नाही, तर 'वसुधैव कुटुम्बकम्' अशा साऱ्या जगाच्या पातळीवरची आहे आणि त्यामुळं ती मात्र न संपणारी आहे.

म्हणजे असं की, माणूस हे या सजीव सृष्टीतलं सर्वांत मोठं भावंड आहे. व्यवहारानंही दिसतं आणि उत्क्रांतीनंही. जलचरांपासून हिंस्र पशूंपर्यंत सगळ्यांना या सृष्टीत स्थान तर आहेच पण त्यांची उपयुक्ततासुद्धा सिद्ध झाली आहे. उत्क्रांतीत ती भावंडं कदाचित मोठीही असतील पण इतर महत्त्वाच्या क्षमतांत माणूसच मोठं भावंड आहे. ही बाकीची भावंड नुसतीच उपयुक्त नसून ती निसर्गाचा समतोलही सांभाळत असतात. हर तऱ्हेनं त्यांना सांभाळण्यासाठी कुठल्या ना कुठल्या प्रकारे मी काय करू शकतो हे बघण्याची गरज वडीलकीच्या नात्यानं आपल्यावरच आहे.

चित्र उलट आहे म्हणून याचा विचार

जास्त करणं गरजेचं आहे. शिवाय मधल्या अनेक दशकांत या जबाबदारीकडं दुर्लक्ष झाल्यामुळं आधीच झालेली आबाळ, हानी - हे आता भरून न निघण्यासारखं आहे. विषारी वायूंच्या गळती, महासागरात विषारी तेलांनी पसरणारी प्रदूषणं, मानवी बेसावधता हजारो मैलांतले जलचर संपवतात. अशा अपराधांचे धनी आपणच आहोत.

शिवाय माणसानं आपल्या सोयीसाठी, जिभेसाठी या भावंडांची अपरिमित हत्या दररोज जगभर आपल्या कल्पनेबाहेर चालवलेली आहे, ती वेगळीच.

याचा अर्थ असा झाला की, ज्यांना सांभाळण्याची शक्तिबुद्धी आणि जबाबदारी निसर्गानं सर्व अर्थानं समर्थ अशा माणसावर टाकलेली आहे आणि तो ती पुरातन काळापासून पेलतही आला आहे, तिच्याकडं आता त्याचं दुहेरी दुर्लक्ष होत आहे. त्यांचा सांभाळ आणि वर्धन यांतही तो कमी पडतो आहे आणि उलट त्यांच्या हत्या आणि विनाशही तोच करतो आहे.

या अर्थानं कधीकधी किरकोळ सुखदुःखासाठी ट्विटरवर लाखोंची सहानुभूती, सहभाग गोळा करणाऱ्या प्रगत माणसाच्या कानी या मुक्या लहान भावंडांचे आक्रोश लवकर पडतील काय ? तो आपली जबाबदारी ओळखेल काय ? आणि निदान संस्था राहू द्या, आपापल्या पातळीवरची जबाबदारी तरी पुरी करील काय ?

*

६. आपली भूमिका

सामान्यतः आपण कुटुंबात राहतो. ते राहतं घर कुठल्यातरी भागात, समाजात असतं. ज्या भागात राहतो, तो भागही असाच कुठल्यातरी गावाचा किंवा शहराचा भाग असतो. आपण नोकरी करीत असू तर तीही एखाद्या ऑफिसमध्ये असते-संस्थेत असते-औद्योगिक क्षेत्रात-एखाद्या उद्योगात असते. ते ऑफिस, ती संस्था, तो उद्योग-हेही बरेचदा कुठल्यातरी एखाद्या मोठ्या संस्थेचे-उद्योगांचे भाग असतात.

आपल्या आजच्या भाषेत ते ऑफिस किंवा तो उद्योग एखाद्या फार मोठ्या केंद्रीय किंवा राष्ट्रीय पातळीवरच्या संस्थेचा भाग असतो.

या कुठल्याही ठिकाणी आपण काम करीत असलो तरी, आपल्या वाट्याचं काम हे एक मर्यादित स्वरूपाचं, विशिष्ट तासांचं - असं काम असतं. घरात दिवसभर उजाडल्यापासून रात्रीपर्यंत कितीतरी व्यवहार होत असतात. त्या साऱ्या व्यवहारातही आपलं काम काही वेळाचं आणि विशिष्ट स्वरूपाचं असतं.

कधी ते स्वयंपाकात पोळ्या करण्याचं असेल, चार माणसांचा सगळा स्वयंपाक करण्याचं असेल किंवा दिवसभर ऑफिसमध्ये जाऊन काम करण्याचं असेल. घरात दिवसभरात सर्वांकडून घडणाऱ्या असंख्य कामांतलं ते काही थोड्या स्वरूपाचं

काम असतं-एक भूमिका असते.

अनेकदा एखाद्या एकत्र कुटुंबात खूप मोठी शेतीवाडी असते. शेतीला धरून असलेले लहानमोठे उद्योगधंदे असतात. घरात राबणारी दहा-बारा माणसं असतात. त्यात या सगळ्या व्यवहारांचा मेळ घालून निर्णय घेणं, आर्थिक व्यवहार पाहणं, हे कुणी करत असतं. तर अक्षरशः घाम काढणारी, कष्टाची रानातली कामं घरातले काही लोक करतात. काही मजुरांकडून काम करवून घेतात, अनेकजण चिखलापाण्यात दिवसच्या दिवस काढतात. कुणी रात्री-अपरात्री राखणीसाठी, पाण्याच्या मोटारच्या पाळीसाठी,कंदील-बॅटऱ्या घेऊन वेळीअवेळी हिंडत असतात. वेळी रानातल्या गार वाऱ्यात पालावर मुक्काम करतात. कुणाचा दिवस नुसता भाकऱ्या बडवण्यात जातो. यातून शेतीचं एक मोठं चक्र चालू असलं, तरी त्यात किती लहानमोठी कामं असतात !

मोठ्या संस्थेत आपण दिवसभरात केलेल्या कामाचं स्वरूप तर किती छोटं असेल ? तर एखाद्या फार मोठ्या फळ्यावर खडूनं उमटवलेल्या एखाद्या बिंदूएवढंही ते असेल की नाही, याची शंकाच आहे.

असं असलं तरी, त्याचा अर्थ त्या कामाला महत्त्व नसतं, असा नाही. कितीही मोठ्या यंत्रातला एखादा लहानसा स्क्रूसारखा पार्टसुद्धा महत्त्वाचा असतो. आकारानं, स्थानानं तो नगण्य असला तरी, तो नसेल, किंवा त्यानं त्याचं काम बरोबर,

वेळेला केलं नसेल तर, ते अवाढव्य यंत्रसुद्धा अडचणीत येऊ शकतं, बंद पडू शकतं.आपली बहुतेकांची जीवनं अशा स्क्रूसारखी असतात. ती तशी असणारही. यात आपल्या अंतरंगाचा संबंध कुठं आहे ?

एकतर काहींना वाटतं, आपण फार नगण्य, लहान आहोत. आपल्याला या यंत्रात-घरात काहीच किंमत नाही. हा न्यूनगंडही अनावश्यक निराशा देणारा आहे. साध्या सिग्नलमननं वेळेला न हालवलेला साधा फडक्याचा बावटासुद्धा हजार माणसांच्या गाडीचं भवितव्य ठरवतो, तर आपल्या घरातल्या, ऑफिसमधल्या छोट्या कामाचं महत्त्व कमी कसं असेल ?

अर्थात दुसरी बाजूही आहे-अनेकांना साऱ्या कामाची-नाटकाची काळजी वाटत राहते. काळजी भूमिकेपुरती करावी, सबंध नाटकाची करू नये. सिग्नल द्यायचं आपलं काम केल्यावर त्या लांबलचक रेल्वेची चिंता करण्याचं कारण नसतं, तसं.

तिसरी बाजू ही की, त्या भूमिकेचं असं रास्त महत्त्व असलं तरी, तिचा अभिमान बाळगण्यासारखंही त्यात काही नसतं. कारण मूळ गाडी ज्या ईश्वराला चालवायची आहे, तो ती दुसरा सिग्नलमन घेऊनही चालवू शकेल. मग अभिमान बाळगण्यापेक्षा भूमिका मिळाल्याची धन्यता बाळगणं आणि ती चोख करणं हे अधिक रास्त ठरेल ना ?

*

७. कष्टांची किमया

पूर्वीची आयुष्यं अधिक कष्टमय होती. शिक्षण म्हटलं तरी कुठंतरी रानात गुरुगृही राहणं इथपासून ते जवळच्या गावी शाळेसाठी मैलोन्‌मैल चालत जाणं, अशा प्रकारचे शारीरिक कष्ट माणसं हौसेनं घेत होती. तीच गोष्ट अन्न, पाणी, नोकरी, शेतीवाडी -अशा सगळ्या बाबतीत होती.

आता सुखसोयी आल्या, यंत्रं आली. साहजिकच हे सारं शारीरिक कष्टमय जीवन लोप पावत चाललं. इतकं की, घरात बसून इथलीच काय परदेशातली पदवीही मिळणं शक्य झालं. सारं शिक्षण डोक्यात ठेवावं लागत होतं,ते ठेवण्याचा सरावही होता. त्या कष्टांनी मेंदू तल्लख राहात होता. या नव्या साधनांनी त्या गरजा संपल्या. यात शारीरिक कष्ट, मेंदूचे कष्ट यांना फाटा मिळाला. कष्ट टळल्यामुळं माणसं या प्रगतीनं सुखावली.

याला आता बरीच वर्षं झाल्यावर मात्र कष्टांमध्ये असलेल्या एका किमयेला आपण मुकलो. शारीरिक कष्टांत अधिक कष्टांची आणि शारीरिक तंदुरुस्तीची नैसर्गिक किमया होती. मेंदूच्या कष्टांतही अधिक कठीण कष्टांना सामोरं जाण्याची किमया होती. त्या किमयांना आपण अंतरलो. या गरजेच्या क्षमता मिळवण्यासाठी कोणती योजना आता आपल्याकडं आहे ?

*

८. यात्रांचा पुनर्विचार

अनेक माणसं तीर्थयात्रा करतात. वेगवेगळ्या क्षेत्रांना जातात. त्यासाठी पैसा, वेळ, शारीरिक कष्ट, गैरसोयी सोसतात. अनेक गावांना हे तीर्थाचं किंवा क्षेत्राचं महत्त्व पूर्वापार चालत आलं आहे. यांना अनेकदा धर्माची पार्श्वभूमी आणि रंग असले तरी, तिथं जाणाऱ्यांची भूमिका, क्षेत्रांचं महत्त्व आणि गरज-या गोष्टी उपयुक्तच असतात. तो एक गरजेचा क्षेत्रधर्म असतो.

पूर्वीच्या काळी आपल्यापुरता विचार केला तर, भारतातला एखादा माणूस किंवा एखादं कुटुंब अमरनाथला, काशीला किंवा चारधामला चाललं म्हणजे एवढ्या मोठ्या निष्ठेनं आणि मानसिक तयारीनं निघे की, जातानाच त्याचं दर्शन घ्यावं. निबिड अरण्य, प्रदीर्घ अंतर,वाटेतल्या ऊन-पावसापासूनच्या साऱ्या गैरसोयी, श्वापदांची भीती-अशा साऱ्या कल्पना त्याला निघताना असतच. त्यांची तयारीही ठेवावी लागे. म्हणूनच जो जाई, तो परतीची आशा न ठेवता.

यात त्या तीर्थांना किंवा गावांना जाताना लागलेला ईश्वराचा ध्यास, कष्ट, अपरिमित त्याग-यांनी देहाचं प्रेम कमी होई. त्या क्षेत्रात होणाऱ्या लाभाची ती पूर्वतयारी असे. त्याचबरोबरीनं अशा सर्व क्षेत्रांच्या ठिकाणी केवळ तपाचरणात आयुष्य व्यतीत करणारे भक्त, महात्मे, साधुपुरुष नेहमी वास्तव्य करीत असत किंवा अशा क्षेत्रांत

राहून तपाचरण करीत असत. त्यामुळं क्षेत्राला क्षेत्रपण येई. त्यात भर पडे ती निसर्गरम्यता-नदी-वृक्ष-यांनी निर्माण होणाऱ्या शांती आणि पवित्रता यांची. त्यामुळं ती क्षेत्रं अधिक पावन होत. हा सारा सत्संग देवदुर्लभ असे. लोकसंख्या कमी, स्थानं दुर्गम, प्रवास पायी, वाटेत देह पडला तरी चालेल, अशा तयारीचे यात्रेकरू-यांमुळं क्षेत्राच्या ठिकाणीसुद्धा साहजिकच गर्दी कमी, अत्यंत स्वच्छता, पुढं वास्तव्यामुळं मन कायमचं पवित्र करण्याला पूरक असं वातावरण. त्यामुळं होणारा लाभ अपूर्व होता, यात शंका नाही.

पण आज आपण यात आणि त्यापासून मिळणाऱ्या लाभात प्रगती केली की, आयुष्यात एखाद्या वेळेस क्वचित मिळणाऱ्या अशा पावनस्पर्शाला मुकलो ? विचार करावा की, जाणाऱ्यांच्या भावातला बदल, हेतूचं भान नसणं, झळ सोसण्याची तयारी नसणं, दळणवळणांच्या साधनांची रेलचेल होणं, क्षेत्रांतली अस्वच्छता, दुर्गंधी, व्यवसायवाद, ज्यामुळं क्षेत्रांना क्षेत्रपण येतं अशा शांतिसमानताप्रिय महात्म्यांचं स्थलांतर वा दुर्लभता, शिवाय अशा ठिकाणचं वाढतं आणि वेगवेगळ्या प्रकारचं प्रदूषण-यांनी क्षेत्रांच्या लोपलेल्या प्रभावामुळं अस्वस्थ होणारे लोक असंख्य आहेत. निदान त्यांनी तरी आता या क्षेत्र-यात्रांचा पुनर्विचार केलेला बरा !

*

९. तपोभूमी की पर्यटनस्थळ ?

क्षेत्रं, यात्रा, त्यानिमित्तानं घडणारी साधना, तिच्यामुळं पुढं टिकणारी मनःस्थिती, त्यानिमित्तानं होणारा सत्संग, नेहमीच्या ऐहिक जीवनापासून काही काळ तरी बाजूला राहून नेहमीच्या जगण्याचं योग्य मूल्यमापन करण्याची मिळणारी संधी, त्याचा आयुष्याच्या उत्तरार्धातल्या महत्त्वाच्या प्रवासात होणारा उपयोग - या साऱ्याची गरज पूर्वीही होती आणि आजही आहे.

इतकंच नव्हे तर, वेगवेगळ्या प्रकारच्या वाढत्या प्रदूषणांमुळं, अस्वास्थ्यांमुळं अशा स्वास्थ्याच्या गरजा पूर्वीपेक्षा उलट जास्त तीव्र झाल्या आहेत, वाढल्या आहेत, हे आपण रोज अनुभवतो आहोत.

फरक इतकाच आहे की, पूर्वीच्या लोकांच्या भाग्यात जी क्षेत्रं होती, त्या ठिकाणचं जे पवित्र करणारं वातावरण होतं, जाणंयेणं हीसुद्धा एक मन शुद्ध करीत जाणारी प्रक्रिया होती - तशा अनेक गोष्टी आजच्या पिढीच्या वाट्याला नाहीत.

उलट दरम्यान झालेल्या तथाकथित बाह्य प्रगतीमुळं यांतले अनेक शारीरिक कष्ट कमी झाले. निबिड अरण्यं,पाऊलवाटा, कष्टमय प्रवास गेले. रस्ते, दिवाबत्ती, जलदगतीची - सुखसोयीची वाहनं, ते सारं वापरण्याएवढी आर्थिक सुबत्ता-अशा गोष्टी

आल्या. जाणं सोपं झालं. पण अशा स्थानांपासून मिळणाऱ्या लाभाचं प्रमाण न वाढता कमी मात्र झालं.

पूर्वीच्या गैरसोयी, कष्ट यांमुळं आयुष्यात कधीतरी जमणारी यात्रा आता अनेकदा करता येते. पण देवळात गर्दी, कोलाहल यांमुळं पाच मिनिटं शांत उभं राहायला न मिळणं - तिथली गलिच्छता पाहता, उभं राहावंसं न वाटणं, तर गाडीचा प्रकार आणि त्यातून उतरणाऱ्या माणसांच्या परिस्थितीचा अंदाज घेणारे मध्यस्थ भेटणं आणि त्यातून अनेकांची पुढं लुबाडणूक होणं - यामुळं नवी पिढीच काय पण बरोबर गेलेली जुनी पिढीसुद्धा परत न येण्याच्या मनःस्थितीला येते.

काहींचा दृष्टिकोनच अपरिपक्व असतो. मूळ हेतूची जाणीव नसलेला, असा असतो. त्यामुळं अशी स्थानं करीत सुटणं, त्या त्या ठिकाणी अधिकाधिक सुखसोयींच्या ठिकाणी कसं राहता येईल, जाता-येता जवळपासचं एखादं स्थान किंवा करमणुकीचं-ट्रिपचं स्थान होत असेल, तर पैसा ओतूनसुद्धा ते कसं करता येईल, याचा प्लॅन करणारे लोक आपण पाहतो. तपोभूमीच्या यात्रांच्या हेतूची मुळात ओळखच नाही, हे दाखवणारे अनुभवही वाढत आहेत.

आपणच या गोष्टींनी तपोभूमींना पर्यटनस्थळांची कळा आणली आहे !

*

१०. क्षेत्रं : शांतिस्थान

माणसाला सध्या जीवघेण्या स्पर्धेच्या युगात वावरायला लावलं जात आहे. अत्यंत सहज अशा जीवनापासून कधी नकळत, कधी प्रलोभनानं, कधी सक्तीनं दूर नेऊन अनैसर्गिक आणि परिणामी दुःखदायक जीवन जगावं लागत आहे. याचं अगदी साधं उदाहरण म्हणजे दिवसभर सूर्याच्या बरोबरीनं आणि साक्षीनं काम करावं आणि निसर्गचक्राच्या सहज प्रवासाप्रमाणं रात्रीच्या वेळी मनाला विश्रांती आणि शांतता देतील अशा गोष्टी कराव्यात, यात पूर्वीही सहजता होती आणि आनंद होता. आजही तसं केलं तर तो राहू शकेल.

पण वेगवेगळ्या दबावांमुळं त्याला आज असं सहज जीवन न जगता उलट रात्र पडली की, नैसर्गिक झोपेच्या आणि विश्रांतीच्या वेळी कामाला निघावं लागतं किंवा अपरात्रीपर्यंत थांबावं लागतं आणि अनेकांना तर पूर्ण रात्रपाळीच्या नोकऱ्या करून रात्रीचा सारा नैसर्गिक विश्रांतीचा वेळ, अनैसर्गिक, कधी बैठ्या, कधी यांत्रिक कामांमध्ये घालवून सकाळी उजाडताना घरी परतावं लागतं. शरीर, मन या दोन्हींच्या कामांच्या आणि विश्रांतीच्या नैसर्गिक गरजेच्या आनंददायी वेळा उलटसुलट होऊन त्याचा परिणाम स्वतःच्या स्वास्थ्यावरच नव्हे तर कुटुंबाच्या आणि पर्यायानं समाजाच्या स्वास्थ्यावरही होतो. म्हणजे

तारतम्यानं पाहिलं तर, पूर्वीची साधी, कष्टमय, गरीबीची जीवनपद्धती असताना जे स्वास्थ्य, शांतता होती, तेवढीही, इतकी प्रगती होऊन आज आपल्या हाती नाही. पूर्वी कुटुंबात जास्त माणसं, रोगराई, असुविधा, कष्टमय जीवन, साधनसंपत्तीचे अभाव असूनसुद्धा शांत, समाधानी असलेला माणूस आता अनेक अनुकूलतांमध्येही- उलट अशांत आणि असमाधानी कसा- याची उत्तरं शोधणं हे एक निकडीचं काम आहे.

एका बाजूला अशांती वाढते आहे आणि दुसऱ्या बाजूला त्याला शांती देऊ शकणारे तीर्थं, क्षेत्रं, मूर्तिमंत शांती असलेले महात्मे दुर्लभ होत चाललेले आहेत. याची आपणा सर्वांना - मग आपण कुठल्याही धर्म, पंथ, देश, समाजाचे असाल तरी - तीव्र जाणीव होत आहे ना ?

शांतीसाठी बाहेरून मिळणाऱ्या मदती आटत चालल्यावर तरी निदान आपल्या घरी ठरावीक वेळी आणि सुटीच्या दिवशी आपणच जपात-ध्यानात-नेमात नियमानं राहावं. तिथंच क्षेत्र आणि तीर्थ निर्माण होईल. सर्व धर्मांच्या अतीत असलेली शांतता आणि ईश्वर तिथं नांदेल-प्रकट होईल. इतरांनाही अनुभवाला येईल.

शांती हा मूर्तिमंत ईश्वर आहे. शांती शाश्वत आहे आणि अनुकूल ठिकाणी प्रकट होणं, हा तिचा स्वधर्म आहे !

*

११. परिस्थितीवर मात

आपण स्वतः म्हणजे आपला देह, मन, चैतन्य आणि आपल्या भोवताली असलेल्या असंख्य वस्तू-व्यक्ती-घटना मिळून आपली एक परिस्थिती बनते. म्हणजे आपली परिस्थिती मांडताना, त्यात इतर गोष्टींबरोबरच आपला स्वतःचाही अंतर्भाव असतोच. सर्वसामान्य माणसाचं लक्ष स्वतःच्या सुखसोयींसाठी परिस्थितीकडं जास्त असल्यामुळं तो स्वतःकडं पाहात नाही - तसं पाहण्याची गरज, त्याच्या लक्षात येत नाही. परिणाम असा होतो की, परिस्थिती आपल्या सुखाची कशी होईल, एवढाच विचार मनुष्य करतो. परिस्थिती सुखाची करणं हाच त्याच्या आयुष्याचा रस्ता होऊन बसतो - ज्याला शेवट नाही !

आता सुरुवातीला पाहिलेल्या परिस्थितीत स्वतःकडं आणि आपल्या परिस्थितीकडं आपण जर असं पाहू शकलो तर, त्याचा लाभ कोणता ? तर, या साऱ्या परिस्थितीचे कितीही वेगवेगळे घटक-प्रकार-गुण असोत, कुठेही जा, एक गोष्ट नक्की लक्षात येईल की, ती परिस्थिती आहे त्या ठिकाणी, आहे तसं, आपल्याला समाधान देत नाही. असमाधानात ठेवते.

म्हणजे असं की, लहानपण कितीही निरागस आणि हवंसं वाटणारं असलं तरी, प्रत्येक लहानाला शरीरानं - परिस्थितीनं लहान राहावसं वाटत नाही.

त्याला वाटतं मोठा झालो म्हणजे मला आनंद मिळेल. मग निदान मोठ्या माणसांनी आनंदात असावं ! पण ते आणि त्यांची परिस्थिती त्यांना सारखं जाणवून देते की, या मोठेपणामुळं आपल्याला दुःख आहे. लहान होतो ते किती सुखाचं होतं ! काम नसताना वाटतं, नोकरी मिळाली की, सुखी होईन. आपल्याला असमाधान आहे ते बेकारीमुळं. नोकरी सुरू झाली की, वाटतं आपल्याला जे असमाधान आहे ते या नोकरीच्या परिस्थितीमुळं. ती सोडली की, आपण सुखी होऊ. हेच एकट्याला वाटतं, लग्न झालं म्हणजे मी सुखी होईन. कुटुंबकबिला असला म्हणजे मात्र त्रस्त होतो. प्रसिद्धी नाही म्हणून दुःखी असतो.तेच खूप प्रसिद्धी झाली, जाऊ तिथं माणसं गोळा व्हायला लागली,चौकात साधं भेळ खाणं अवघड झालं - तर त्याच प्रसिद्धीमुळं दुःख आहे, असं वाटतं.

असमाधान हा परिस्थितीचा गुण असल्यामुळं परिस्थितीत आनंद कधीच नाही. ती साक्षीभावानं पाहण्यात आहे. मग त्या अर्थानं तो कधीही असतोच ! हे लक्षात यायला मात्र परिस्थितीचा हा गुण लक्षात यायला लागतो. त्यासाठी स्वतःपासून आणि परिस्थितीपासून वेगळं होऊन पाहण्याची ही विद्या यावी लागते मग मात्र ती विद्या परिस्थितीच्या असमाधानात ठेवण्याच्या गुणावर मात करते !

*

१२. डोळस प्रवास

विज्ञानाच्या गेल्या काही शतकांत होत चाललेल्या वेगवान प्रगतीमुळं अनेक समजुती, रूढी, अंधविश्वास, पिढीजात कल्पना - यांना धक्का दिला, हे खूप चांगलं झालं. जे काही करीत आलो किंवा आजही करतो त्यावर निदान विचार करण्याची गरज निर्माण झाली. तर्कशुद्ध विचाराला रोजच्या व्यवहारातही बऱ्यापैकी स्थान मिळालं. अनेक शोधांनी यंत्रं-साधनं पुढं आणली, ज्यांनी माणसांचा व्यवहार सुकर केला. फार मोठे बदल जर कुणी घडवून आणले असतील तर, शेतीपासून वेगवेगळ्या क्षेत्रांतल्या अवाढव्य यंत्रांनी, तंत्रज्ञानांनी आणि पुढं अजूनही पुढची वाटचाल करीत असलेल्या संगणकांनी.

या प्रगतीमुळं कामांचा वेग जसा प्रचंड वाढला तसा माहितीचा विलक्षण साठा-देवघेव-अचूकता-यांतली क्रांती ही डोळे दिपवणारीच आहे. यात अश्मयुगापासून लाकूड-लोखंडाच्या युगापर्यंतची अनेक अवजारं, यंत्रं यांची गरज कमी करून टाकली. काही बाबतींत ती संपवली. यंत्रांनी आणि रबर - प्लॅस्टिकसारख्या अनेक नव्यानव्या रासायनिक वस्तूंनी हळूहळू माणसाचं जीवन व्यापून टाकलं. त्यात लाकडाचे नांगर गेले, दगडाची जाती गेली, बैलगाडीची चाकं आणि लोखंडाची चक्रही गेली. कुदळ गेली तशी फावडी, घमेली गेली.

टाक-दौत गेली, बोरू गेले, कीर्दखतावण्या गेल्या, दिवाणजींची डेस्क गेली, घोड्यांचे नाल गेले, बैलगाडीची 'जूं' गेली, रहाटांचे हात गेले, पायरहाटांचे पाय गेले, मोटा गेल्या, दोरखंड गेले...

विज्ञानाच्या फायद्यांची आता नुसतीच प्रगती न राहता जीवघेणी स्पर्धा, अनेकदा फरफट आणि आपलं लक्षही जात नाही एवढी अनैसर्गिकता वाट्याला आली.

वैज्ञानिक तंत्रज्ञान आपल्याकडं विकसित झालेलं नसल्यानं साधनं, वस्तू परदेशातून आयात झाल्या. अनेक वस्तूंतली सफाई, उपयोग, नवी रचना यांच्या आकर्षणापोटी त्यांच्या वापराची न सुटणारी सवय लागली.

यातल्या अनेक यंत्रांमुळे, वस्तूंमुळे माणसाचे शारीरिक कष्ट खूप कमी झाले. शारीरिक कष्ट कमी होणं कुणाला नको असतं ? जी गोष्ट दिवसभर राबून तयार होते, तशा दहा गोष्टी जर यंत्रांच्या साहाय्यानं चार तासांत तयार झाल्या, तर त्याचं नुसतं आश्चर्यच नव्हे, तर आकर्षण वाटणं स्वाभाविक आहे,

पण हा प्रवास डोळे मिटून चालत राहिला, तर वस्तूंवरचं वाढतं परावलंबित्व, वस्तूंच्या निर्मितींच्या कलांचा विसर, शरीरकष्ट गेल्यामुळं दुर्बळ होत चाललेली माणसं - यांसाठी आपण पुढंपुढं काय करणार आहोत ?

*

१३. जबाबदारी जगवण्याचीही

मातीचा माठ भले टिकाऊ नसेल, प्लॅस्टिक हलकं आणि स्वस्त असेल पण कुंभाराचा माठ नुसताच पाणी भरण्याची वस्तू नव्हता. त्याचं आणि त्याच्या कच्च्याबच्च्यांचं पोट भरणारे दोन हात त्या माठामागं होते. माठ पाणी नुसतंच गार करीत नव्हता, तर धान्यही साठवीत होता. चिंच-मिठासारखी वस्तूही सांभाळीत होता. फुटलाच तर तो मातीचाच भाग असल्यामुळं मातीत मिसळून जाऊ शकत होता. माठाचा फुटलेला तुकडासुद्धा वेळी रेघा ओढत होता तर, राखेसारखी भांडं घासायची वस्तू सांभाळीत होता. उडालेली माठाची कपचीही मुलांच्या खेळाचं साधन होतं.

जे या माठामागच्या हाताचं होतं तेच 'जू' मानेवर घेणाऱ्या बैलाच्या जीवनमरणाचं होतं. चाकं, आऱ्या, धावा बनवणाऱ्या माणसांचं होतं. पण बैल आता गाडीला नको, बैल नांगराला नको, बैल मोटेला नको.

आपण क्षणभर विचार करावा की, आपापल्या घरात आपल्या मित्रमंडळीत आपलं एक स्थान असतं. भले ते लहान-मोठं असेल. पण काही कारणानं कुणालाच आपली कुठल्याही अर्थानं गरज उरली नाही, किंबहुना आपण कुणाला उपयोगी तर नाहीच, पण नकोसे झालो, तर त्या वेळेला जे वाईट वाटतं, ते आपल्याला नक्की कळत असेल. त्यापोटी मनात उमटणाऱ्या प्रतिक्रिया

आणि त्यापोटी बाहेर ओघळणारे अश्रू आपल्याला परिचित असतील. आपल्याला ती वेळ येऊ नये, असं तर वाटेलच पण अगदी सहज निर्माण होणारी सहानुभूतीची प्रतिक्रिया म्हणूनही आपण अनेकदा म्हणतो तसं दुसऱ्या कुणावरही अशी वेळ येऊ नये, असं आपल्याला वाटतं.

आता असा विचार करावा की, इतक्या मार्गानं निरुपयोगी केलेल्या या मुक्या जनावरांचं काय होत असेल, त्यांना काय वाटत असेल आणि त्यांची दखल सहानुभूतीनं घेणारा जीव या जगात माणसाशिवाय दुसरा कोण आहे ?

असं असताना माणूस तर उलटं त्या जनावरांची रवानगी कत्तलखान्यात करतो आहे. आपल्याला माहिती असेल की, पशु उपयोगाचा राहिला नाही याचा दाखला घेतल्याशिवाय त्याला मारण्याची परवानगी देऊ नये, इतपत निदान कायदा करणाऱ्यांना तरी त्याची दया आहे.

पण तोच कायदा वाकवणाऱ्या, जिव्हालोलुप माणसांकडून याच जनावरांना उपाशी ठेवून, त्रास देऊन देऊन त्यांना निरुपयोगी करून हे दाखले मिळवले जातात. त्यांना पुन्हा माणसांचंच खाद्य बनवण्यासाठी त्यांची कत्तल केली जाते.

प्रगती असू द्या, पण मूल्यवान जनावरांना जगवण्यासाठी काही करण्याची जबाबदारी माणसाचीच नव्हे काय ?

*

१४. अश्रूंचं मोल

खरंतर आपण यंत्राचा स्वीकार केला, तो आपली होणारी सोय बघून. काम स्वाधीनचं झालं, गती वाढली, कामातली अचूकता वाढली, वेळेची बचत झाली, क्षेत्र शेतीचं असो किंवा औद्योगिक असो, त्या त्या ठिकाणी उत्पादनं वाढली, नफा वाढला.

गावात शेतीच्या कामांसाठी घरातली माणसं सहसा कधी पुरत नव्हतीच. गावागावांत जेवढा मोलमजुरी करणारा वर्ग होता, तोही अनेकदा पुरत नसे. त्यावेळी अनेकदा एकमेकांच्या मदतीला माणसं जरुरीप्रमाणं जात होती. एकमेकांच्या बैलजोड्यासुद्धा एकमेकांच्या मदतीला देण्याची पद्धत होती. त्यात दोघांचंही काम होत होतं. एकमेकांना मदत होत असल्यामुळं यात कुठं फारसा पैशाचा संबंध येत नव्हता.

पण दारात यंत्रं उभी राहिल्यावर माणसाला मजुरांची गरज उरली नाही. दहा माणसांच्या मागं कुठंतरी एखादा माणूस लागायला लागला. शेजार-पाजारच्या माणसांचीही मदतीची गरज संपली. याचा खरा वाईट परिणाम हा झाला की, एका चांगल्या अर्थानं जोडली गेलेली माणसं दुरावली. इतरांशी संबंध हवेच कशाला, असा कोरडा भाव माणसांच्या ठिकाणी वाढायला लागला. त्याचा परिणाम माणसांच्या इतर संबंधांवरसुद्धा झाला . तुझा तू मोठा, माझा मी मोठा , अशी वृत्ती बळावली. तीच वृत्ती

कुटुंबातल्या माणसांची एकमेकांबद्दल झाली. हाती पैसा आल्यामुळं नात्या-गोत्यांचीही गरज, कमीकमी होत चालली.

एका विज्ञानाचा संसर्ग झाला आणि त्यावर आपण विचारशील राहिलो नाही, तर कुठं जाऊन पोचतो, त्याचा अनुभव या शतकानं आपल्याला आपले डोळे उघडावेत, इतका दिला आहे. याचा अर्थ विज्ञानाची प्रगती नसावी किंवा झाली ती वाईटच होती, असा नक्कीच नव्हे. पण त्याच्या परिणामांचा दूरगामी विचार करण्याची गरज फार मोठी होती, हे स्पष्ट झालं.

आता जे घडून गेलं आहे, ते गेलेलंच आहे. पण अनुभवांच्या एवढ्या शिदोरीवर आपण पुढं जागे राहिलो,उपाय शोधत राहिलो, तर पुढची नुकसानं टाळू शकू. त्यासाठी विज्ञानाच्या घडचाळाचे काटे उलट फिरवण्याची गरज नाही. विज्ञानाची चालती गाडी बंद पाडण्याचीही गरज नाही. फक्त निसर्गाच्या, पशुपक्ष्यांच्या, माणसाच्या जिवंत जगाच्या आनंदाची, त्याच्या गतीचा आणि दिशेचा जो विसंवाद झाला आहे, तो सुधारण्याचं दक्ष धोरण पुढं जरूर ठेवता येईल. कारण यंत्रांना अश्रू येत नाहीत, त्याचं मोल करता येत नाही आणि ते पुसताही येत नाहीत. पशू पराधीन आहेत, त्यांना फक्त अश्रू येतात. माणसाला मात्र या सगळ्याच क्षमता आहेत आणि अश्रूंचं मोल ओळखण्याची जबाबदारीही त्याची आहे!

*

१५. आत्मविश्वासाचं गमक

एखादी गोष्ट करायची तर काय करायचं आहे, याची निश्चित कल्पना, कुणाचं तरी मार्गदर्शन, प्रयत्न, सातत्य, चिकाटी - अशा अनेक गोष्टींची साथ असते तेव्हा ती गोष्ट यशस्वी होते.

या सगळ्यात एक आंतरिक घटक असतो. तो म्हणजे आत्मविश्वास. एकवेळ मार्गदर्शन, प्रयत्न यांना दृश्य बाजू आहेत पण ते सगळे बाह्य घटक कार्यरत व्हायला आतून मदत करणारा, बळ देणारा हा अदृश्य घटक आत्मविश्वासाचा.

आत्मविश्वास असला की, बाह्य गोष्टी थोड्या कमी असल्या तरी चालतं. या आत्मविश्वासानं ते सारं निभावलं जाऊ शकतं. इतकंच नव्हे, तर उलट या मूळ पक्क्या आत्मविश्वासानं अशक्यप्राय गोष्टीसुद्धा अमलात आलेल्या दिसतात. सामान्यांकडून असामान्य कामं घडतात. अशक्ताकडून सशक्ताला जमणार नाहीत एवढी कामं घडतात. साधारण मार्क मिळवील असा वाटणारा विद्यार्थी नंबरात येताना दिसतो.

याच बाबतीत हेही दिसतं की, अनेकदा याच घटकाच्या अभावामुळं ज्याला जी कामं शक्य आहेत, ती कामंसुद्धा त्याला जमत नाहीत. प्रयत्न करून, खूप वेळ जाऊनही यश येत नाही. कधीकधी सतत अपयशानं येणाऱ्या निराशेनं खचणारे

लोकही दिसतात. त्यावेळीही कमी पडतो तो हाच आत्मविश्वासाचा महत्त्वाचा घटक.

काही यशस्वी लोक सोडले, तर अनेक विद्यार्थी, नोकरदार, उद्योजक, गृहिणी - या आत्मविश्वासाच्या अभावामुळं आपापल्या क्षेत्रात अपयशाच्या अंधारात चाचपडत असतात, मार्ग शोधत असतात. त्यांना आत्मविश्वासाची निकड कळते. आपल्या अंगी तो असावा, असंही वाटतं. तो यावा म्हणून काय करावं, ते लक्षात येत नाही. अनेकदा याविषयी व्यावसायिक मार्गदर्शनं, सल्ले उपयोगी पडत नाहीत. ते मार्ग अनेकदा वरवरचे असतात. अनेकदा अनेकांचा तो पैसा मिळवण्याचा एक व्यवसायही असतो.

यावर एक सोपा उपाय असतो. कुणी असेल त्या ठिकाणी, असेल त्या परिस्थितीत करता येण्यासारखा. त्याचं गमक एकच की, आत्मविश्वास जरी मोठ्या प्रमाणात हवा असला तरी, तसा तो कधीच एकदम मिळत नाही. हजार पावलांचा रस्ता एकदम कधीच चालता येत नाही. तो संपवण्यासाठी रोजचं खात्रीनं आणि नियमित टाकलेलं एक पाऊलसुद्धा उपयोगी पडतं. त्याचबरोबर रोज कमी होणाऱ्या अंतराबरोबर हाच आत्मविश्वास पावलापावलानं वाढतही जातो. आणि शेवटी आपल्याला अपेक्षित प्रमाणावर तो येऊन पोचतो.

वाटल्यास कसा ते पुढं पाहू.

*

१६. आत्मविश्वासाकडं वाटचाल

आपल्यातल्या अनेकांना नव्या वर्षाच्या पहिल्या दिवशी केलेल्या संकल्पांची आणि त्यापुढं घडलेल्या घटनांची आठवण असेल. पहिला दिवस उत्साहानं पार पडतो, दुसऱ्या दिवशी कसाबसा पार पडतो, तिसऱ्या दिवशी कुठल्या तरी कारणानं-सबबीवरून बारगळतो. तो थेट बंदच पडतो. ठरवलेल्या गोष्टी करण्याची गरज, निकड तितकीच जाणवत असते. त्या त्या गोष्टी न केल्यामुळं इकडं नुकसानही होत असतं.

पण संकल्प बारगळण्याचा अनुभव इतक्या वेळा येतो की, हळूहळू संकल्प करण्याचा आत्मविश्वास ढासळतो. निराशा येते. आपल्या आयुष्यातल्या इतर क्षेत्रांतही याचा दुष्परिणाम होतो. त्यासाठी सोपा उपाय करून पहावा.

फिरायला जायचं ठरवण्याऐवजी सकाळी सहा वाजता फक्त उठण्याचा संकल्प करावा. उठावं आणि इतर काही कामं करावी. काही दिवसांनी ते स्थिर झाल्यावर उठून घराचं दार, बंगल्याचं गेट उघडणं अशा गोष्टी विशिष्ट वेळी करण्याची गरज असते, त्यावेळी उठण्याचा आणि त्या करण्याचा संकल्प करावा. आठवडाभर पाळावा. तो तडीला जातो. त्यानं एक महत्त्वाची गोष्ट घडलेली असते. आपण जे ठरवतो आहोत, ते आपल्याला करता येतं आहे, हा आत्मविश्वास नकळत जागा झालेला असतो.

पुढं हे गेट उघडणं नियमित झालं की, तिथून एक शंभर पावलांवर असलेल्या चौकात जाऊन त्यानिमित्तानं दूध किंवा पेपर आणायचं काम करण्याचा संकल्प करावा. आपल्या लक्षात येईल की, हे गणित जमत चाललेलं आहे. आठ-पंधरा दिवस नियमितपणे हे केल्यावर लक्षात येतं की, आता आपण सकाळी पाच-साडेपाचला उठू शकतो आहोत, गेट उघडण्यासारखं काम करत आहोत, नियमितपणे चौकात जाऊन येतो आहोत.

आता याच चौकातून पुढं जवळच्या एखाद्या अर्धा-एक किलोमीटरच्या मंदिरात किंवा बागेत जाऊन येण्याचं ठरवावं. लक्षात येईल की, तेही आता नियमितपणे घडतं आहे. जागा झालेला आत्मविश्वास आता मूळ धरतो आणि वाढतही जातो.

मग पुढच्या टप्प्यात अनेक वर्ष अशक्य ठरलेले दोन किलोमीटर आता सहजपणे आणि नियमानं पार पडतात. तेव्हा कळतं की, हे आत्मविश्वासाचं गणित पायरीपायरीनं आणि पावलापावलानंच सुटत जात असतं.

वाटताना ही गोष्ट साधी वाटत असली, तरी आपल्या आयुष्यातल्या शिक्षणापासून व्यवसायापर्यंतच्या अनेक क्षेत्रांत लागणारं आत्मविश्वासाचं बळ द्यायला ती समर्थ आहे !

*

१७. मुंगी हा गुरू

माणूस शिकतो तो पाहून, अनुकरणातून, कुणाच्या शिकवण्यातून. या तीनही गोष्टी ज्या ठिकाणी एकवटलेल्या असतात, त्याला गुरू मानावा. जगण्यासाठी अनेक विद्या लागतात. वागण्याच्या पद्धतीपासून समाधान किंवा परमेश्वरप्राप्तीपर्यंत. वागण्यात कला असते, बोलण्यात कौशल्य असतं, प्रयत्नात अचूकता असते, कष्टात चिकाटी असते, अपयशावर मात करण्याची विद्या असते, इतर शास्त्र - कलांत या गोष्टी तर असंख्यच आहेत.

या सगळ्या गोष्टींनी माणसाचं जीवन आणि अंतरंग समृद्ध, आनंदमय होतं. आपण होऊन लक्षात घेऊन शिकणं हे चांगलं आहेच. अनुकरणातून, प्रेरणा घेऊन शिकणंही चांगलंच. पण या आत्ता उल्लेख केलेल्या गुणातला एखादा गुण जरी कुठं आढळला, तर तो प्रत्यक्ष अंमलात आलेला पाहाणं, शक्य असलं तर त्या व्यक्तीकडून ते कसं साधावं हे शिकून घेणं, त्यांनी साधलेल्याचं प्रात्यक्षिक पुन्हा पुन्हा पाहाणं आणि प्रत्यक्ष आपण प्रयोग करून ती गोष्ट शिकणं, साध्य करणं हे माणसाला समृद्ध करीत जातं, ज्याचा समाजालाही उपयोग होत असतो.

असं ज्याच्याकडून आपण शिकू शकतो, त्याला त्या त्या विद्येचे , कलेचे ,

कौशल्याचे, गुरू समजून आदरानं शिकावं. त्यानं त्यात भावनेचं बळ मिळून अधिक फायदा होतो. त्यांच्याकडूनही त्या भावापोटी जास्त कृपा मिळून आपलंच काम यशस्वी होतं.

सर्वांच्याच वाट्याला गुरू म्हणून अशा कुणी व्यक्ती येतील, त्या सांगतील, आपलं शंका निरसन होईल , आपल्याला ती ती गोष्ट साध्य होईल - असं नाही. तसं होणं भाग्याचं असलं, तरी ते भाग्य सगळ्यांच्या वाट्याला येईल, असं नाही पण त्यासाठी अडून बसायचं कारण नाही. निसर्ग हा इतका थोर गुरू आहे की, तो कुठल्यातरी रूपानं आपल्याला असा गरजेचा गुरू उपलब्ध करून देत असतो.

ध्येय, त्याची ओळख,चिकाटी यांचा उपयोग आपल्या आयुष्यात किती आहे, हे वेगळं सांगायला नको. पण एक साधी मुंगीसुद्धा त्या बाबतीत आपला गुरू कसा बनते, हे कुणीही अनुभवून पहावं असं आहे.

पाडव्याच्या दिवशी सकाळी सात वाजता पुसून स्वच्छ केलेल्या अंगणातल्या जागेवरून पंचवीस फूट उभी केलेली गुढी आठ तासांनी खाली उतरवताना तेवढ्या तासांत त्या गुढीच्या टोकावर बांधलेल्या माळेवरच्या साखरेवर बसून मुंगी साखर खाताना पहावी. एवढासा जीव इतक्या कमी वेळात वर सांगितलेल्या इतक्या गोष्टींच्या बाबतीतला आपला गुरू ठरेल !

*

१८. 'गुरू'किल्ली

माणसाला यशापर्यंत पोचण्यासाठी दोन गुण अनेकदा कमी पडतात, त्यांची ओळख वेळीच झाली आणि ते कसे मिळवावे हे कळलं, उदाहरण पाहायला मिळालं, तर माणसाचं आयुष्य खूप बदलून जाईल, यात शंका नाही.

एकदा मी नियमितपणे रोज जपाचा काही संकल्प केला. त्यासाठी मी रोज अंगणात खुर्ची टाकून जपाला बसत असे. वेळा मागंपुढं होणं, कमी पडणं, अचानक कामं, फोन अशा अडचणी उद्‌भवणं - या कारणांनी रोज ठरवलेलं ध्येय काही गाठता येईना. एक - दोन दिवस त्या गोष्टीचं फार वाटलं नाही. पुढच्या दोन दिवसांत आपण ते भरून काढू, अशी कल्पना होती. पण पुढच्या दोन-तीन दिवसांत भ्रमनिरास झाला. दररोज मागं पडणाऱ्या जपाचं प्रमाण वाढत होतं. सात-आठ दिवस गेल्यानंतर मागं राहिलेलं काम एवढं मोठं झालं की, आपणच देवाची क्षमा मागून या कामातून आपली सोडवणूक करून घ्यावी आणि काही ध्येय वगैरे ठेवू नये, असे विचार मनात यायला लागले.

हे विचार करीत करीत इकडं जप चालू होता. खुर्चीत बसल्याबसल्या माझं लक्ष सहज समोरून वर जाणाऱ्या जिन्याच्या पायऱ्यांकडं गेलं. पहिल्या पायरीच्या टोकापर्यंत गेलेली एक मुंगी वरच्या

गुळगुळीत फरशीची कड ओलांडताना घसरून पुन्हा जमिनीवर आलेली दिसली. काही क्षणात माझ्या असं लक्षात आलं की, जमिनीवरून थोडी जागा पुढं जाऊन तिनं पुन्हा त्या पायरीचा चढ चढायला सुरुवात केली होती. तिच्या जिवाकडं पाहिल्यावर मला असं वाटलं, तिला ही पायरी म्हणजे सुद्धा एखाद्या डोंगराच्या कड्यासारखी दिसत असेल!

मी बारकाईनं पाहू लागलो. पुन्हा नव्या दमानं ती दुसऱ्या ठिकाणाहून तोच चढ चढत होती. काही वेळात ती पुन्हा त्या गुळगुळीत फरशीच्या कडेवर आली आणि तिथं निसटून परत जमिनीवर येऊन पडली. तिच्या जिवाला ती गुळगुळीत बाजू आणि ती तासलेली कड ओलांडणं बहुतेक अवघड जात असावं. माझं कुतूहल जागं झालं. पुन्हा पाहिलं, तिनं त्याच्या पुढच्या जागेवरून पुन्हा वर चढायला सुरूवात केली होती. पुन्हा व्हायचं तेच झालं, ती तिसऱ्यांदा खाली आली. पायरीच्या डाव्या हाताला अशीच कड होती, त्यामुळं तिथं तिकडून तिनं केलेले प्रयत्न असेच अयशस्वी झाले असतीलही. म्हणून ती दर प्रयत्नाला पुढच्या बाजूला सरकत पायरीच्या उजव्या टोकाला जात होती. आता तिचा चौथा प्रयत्न होता. मी ते प्रयत्न मोजत होतो. अपयश येऊनही उमेदीनं पुढचा प्रयत्न करण्यातली तिची चिकाटी दिसत होती. अपयशानं ती खचत नव्हती. प्रयत्नांना पुन्हा सुरुवात योग्य दिशेनं

करीत होती. हे समोर दिसत होतं. पायरीचं निरीक्षण केल्यावर माझ्या हे लक्षात आलं होतं की, पायरीच्या अगदी शेवट उजव्या टोकाला भिंतीशी पायरीची कड संपत होती आणि थोडं सिमेंटकाम होतं. मुंगीचा प्रत्येक चढण्याचा प्रयत्न हा तिला त्या दिशेनं नेत होता. आता तिच्या प्रयत्नांची मी नकळत मोजदाद करत होतो. एकवीस प्रयत्नांनंतर ती मुंगी पायरीच्या कडेच्या त्या सिमेंटच्या भागाकडं आली आणि बाविसाव्या वेळी चढताना सिमेंटच्या कडेचा आधार घेऊन तिनं ती पायरी अखेर ओलांडली. यशस्वी होण्यासाठी लागणाऱ्या चिकाटी आणि अपयशानं खचून न जाता पुन्हा प्रयत्न करणं, या कमी पडणाऱ्या दोन गुणांचा गुरू मला समोर दिसत होता. या प्रात्यक्षिकानं आता मला मागं पडणाऱ्या जपाची भीती उरली नव्हती, उलट तो भरून काढण्याचा आत्मविश्वास आला होता.

मी समोर पाहिलं.आता मुंगीकडून तिसरा गुण शिकायला मिळत होता. ती दुसरी पायरी सिमेंटच्या भिंतीकडून वर ओलांडून तिसऱ्या पायरीकडं चालली होती. दुसरी पायरी ओलांडताना तिनं मागची एकवीस वेळची अपयशं लक्षात घेऊन त्या पुढचे प्रयत्न अधिक अचूक केले होते. माणूस म्हणून आपल्याला हे आता आव्हानही होतं, यशाचा मार्गही होता आणि कुठल्याही क्षेत्रात उपयोगी पडणारी 'गुरु'किल्लीही !

ळ

१९. प्रथांचा पुनर्विचार

लग्नासारख्या विधीतल्या प्रथांच्या मागं अनेकदा खूप चांगली तत्त्वं असतात. पण याची अनेकांना कल्पना नसते. काळाप्रमाणं त्यांची ही सांगड आजच्या परिस्थितीशी घालावी लागते. याची जाणीव कमी पडते. जसं जात्यांचं पूजन.

लग्नात जेवणाला महत्त्व मोठं. त्यासाठी जाती, उखळ आणि चूल यांचं महत्त्व. त्या साऱ्यांनी आपल्याला कार्यात साथ दिली, तर ते यशस्वी होईल. त्याची जाणीव ठेवण्यासाठी या जात्यांचं पूजन, ही त्यातलीच एक प्रथा. त्यासाठी आजच्या काळात घरोघरी शोधून न मिळणारं जुनंपानं जातं कुठून तरी आणलं जातं. त्यापेक्षा आज हेच काम करणारी गिरणी अगदी जवळ उपलब्ध असते. रात्री काम संपल्यावर किंवा सकाळी सुरू होण्यापूर्वी त्यातली ही जाती सोडवून, स्वच्छ धुवून ठेवलेली असतात. आज जर आपण पूजा साहित्य घेऊन तिथं गेलो, त्या जात्यांची पूजा केली, गिरणीमालकाला पानसुपारी दिली, तर हेतूही साध्य होईल, पोकळ उपचार टळेल. एरवी या जात्यांची आणि गिरणीमालकांची न घडणारी विशेष कदर घडेल, त्यावेळी त्यांच्या चेहऱ्यावर फुलणारा आनंदही पाहायला मिळेल ! अशा कितीतरी प्रथांचा पुनर्विचार करून त्या आनंददायी करता येतील !

*

२०. मर्यादांची ओळख

माणसाला आनंदानं जगण्यासाठी अनेक गोष्टींची ओळख लागते. त्यातल्या काहींची ओळख लवकर होते. काहींची उशीरा. त्यांत सहसा उशीरा ओळख घडणारी गोष्ट म्हणजे माणसावरच्या मर्यादा.

मूळ जग जरी अमर्याद, अनंत असलं, तरी त्याचे आपल्याला दिसणारे झाडापेडापासून ग्रहगोलापर्यंत सारे अविष्कार आपापल्या परीनं मर्यादित आहेत. दगडाला स्थैर्याची, झाडाला वाढण्याची, नदीला काठांची, माणसाला आयुष्याची - अशा अनेक मर्यादा आपल्या डोळ्यांना स्पष्ट दिसणाऱ्या आहेत. इतकंच काय , ज्या डोळ्यांनी आपण हे पाहातो त्या डोळ्यांना दिसण्याचीसुद्धा मर्यादा आहे !

कुठलंही कार्य करताना- शिकताना, समजून घेताना, कला आत्मसात करताना, विद्या शिकताना, कर्तव्य करताना, अनेक प्रकारची ध्येयं गाठताना - माणसाला असं शिकवलं जातं की, हे सगळं साध्य करायचं असेल, तर कुठल्या मर्यादांची भीती बाळगू नका. आपली कर्तृत्वशक्ती असीम आहे. आपण ठरवलं, तर जगात काहीही साध्य करू शकू.

प्रयत्न करताना उत्साह बाळगण्यासाठी हा दृष्टिकोन बरोबर असला, तरी त्यामुळं वर म्हटल्या तशा सगळ्या गोष्टींच्या मर्यादा टळतात, असं मात्र नव्हे.

वेळेनुसार त्या मर्यादा त्या त्या ठिकाणी समोर येतात आणि तिथं थांबावं लागतं. थांबणं हिताचंही असतं.

उमेदीनं खेळात, स्पर्धेत, प्रपंचात, कलेत, करियरमध्ये - उतरणाऱ्याला जो आत्मविश्वास लागतो, त्याची गरज उघड आहे. पण दुसऱ्या बाजूला मर्यादांची ओळखही तितकीच महत्त्वाची आहे. आपल्याकडे असीम शक्ती आहे, या विश्वासामुळं माणसाकडून त्याच्या शक्तीपेक्षा थोडं जास्त काम घडतं, हा या विश्वासाचा फायदा आहे. पण असीम शक्ती असल्याचा भ्रम असू नये. तो असला तर पुढं ज्या गोष्टी मर्यादेमुळं घडू शकत नाहीत, तिथं निराशा येते. मर्यादांची ओळख हाच त्याला मार्ग आहे. आत्मविश्वासानं कार्य व्हायचं तेवढं होईल, पण मर्यादा माहिती असल्यामुळं तिथं आनंदानं थांबता येईल.

खेळ असो, प्रपंच असो, गायन-वादन असो, नोकरीतली बढती असो, राजकारणातलं पद असो, लेखनातली उंची असो - कुठल्याही क्षेत्रात आपल्या मर्यादेचं टोक गाठणं किंवा त्यापुढं पाऊलभर जाणं, यांतला आनंद या मर्यादा ओळखण्याच्या विद्येमुळं टिकून राहतो. अवाजवी स्वप्न, इतरांशी तुलना यांनी अकारण निराशा येते. मिळवलेला आनंद ती वाया घालवते.

त्यासाठी फक्त हवी आपापल्या मर्यादांची ओळख आणि तीही वेळेत !

*

२१. विकासाचं गणित

सर्व जगाचा आपल्याआपल्या परीनं एक नैसर्गिक विकास सुरू असतो. प्राणी, पशुपक्षी यांचेही नैसर्गिक विकास होतात. त्यामुळं एक साधारण अनुकूलता असली की, लहान बाळाचं मोठं मूल- युवक -तरुण -प्रौढ -असा विकास नैसर्गिकपणे घडतो.

यामुळं अशी एक समजूत मात्र नकळत होऊन बसते की, जसा माणूस लहानाचा मोठा झाला, मुलाचा युवक किंवा प्रौढ झाला तसा तो अनुभवी, समंजस, जबाबदारसुध्दा होत जाईल. किंबहुना आपण ते गृहीत धरलेलं असतं. म्हणूनच आपल्या लक्षात येईल की, आपल्यासारख्या लोकशाहीत पंधरा-सोळा वर्षापर्यंतच्या मुलात तेवढी परिपक्वता नसेल, स्वतःचं मत बनवता येत नसेल, इतरांचा प्रभाव, अनुकरण यामुळं चूक-बरोबर ठरवणं अवघड जात असेल. स्वाभाविकपणे स्वतःच्या आणि इतरांच्या काय हिताचं आहे त्याचे निर्णय तो घेऊ शकणार नाही.

पण जसा तो अठरा वर्षांचा होईल, तसा तो परिपक्व होईल, त्याला स्वतःचं हितअहित कळेल, निश्चित आणि योग्य मत असेल. स्वतःसाठी आणि इतरांसाठी काय हिताचं होईल, हे त्याला ठरवता येईल. हे गृहीत धरून वयानुसार आपण त्याला अनेक अधिकारही देतो.

एखादा व्यवहार करणं,करार करणं,

तो पाळणं, न पाळता आल्यास त्याची जबाबदारी घेणं, अन्याय ओळखणं, अन्यायाच्या प्रतिकारासाठी न्यायालयात जाणं-असे अनेक अधिकार या वाढत्या वयाला धरून आपण देतो.

इतकंच काय, आपलं आणि आपल्या समाजाचं भलं कोणती राजकीय प्रणाली करू शकेल किंवा कोणती व्यक्ती ते करू शकेल, ती प्रणाली किंवा ती व्यक्ती प्रतिनिधी म्हणून निवडण्याचा-म्हणजे मतदानाचा-हक्कसुद्धा आपण अठराव्या वर्षी त्याला अधिकृतरित्या देतो.

निसर्गाचा विकासाचा क्रम पाहिला, तर आपण त्याला धरून हा विचार करतो हे बरोबर वाटेल. पुढं जाऊन पाहिलं,तर आणखी सात- आठ वर्षं गेली की, ती व्यक्ती निसर्गाप्रमाणं अधिक विकसित होऊन स्वतःच पाचपन्नास हजार लोकांचं प्रतिनिधित्व करू शकेल. त्यासाठी कायदेकानू करील, असंही आपल्याला वाटतं म्हणून आपण प्रतिनिधित्वाचा अधिकारही त्याला देतो ! पण आपला अनुभव काय सांगतो ? अशी परिपक्वता नुसत्या वयाच्या वाढीबरोबर गणितासारखी येत नाही. वर अपेक्षित विकास आंतरिक आहे, समजुतीचा आहे. त्यासाठी वेगळे प्रयत्न केले तर तो होईल. ते न केले, तर हे अधिकार देणं फोल ठरेल. कारण शारीरिक विकासाच्या वाढीचं गणित वर अपेक्षित विकासाला लागू नाही !

*

२२. आंतरिक विकासाचं वेगळेपण

निसर्ग वयानुसार, काळानुसार सारे शारीरिक विकास घडवीत जातो. आपण असं गृहीत धरतो की, समजूत, सहानुभूती, स्वतःच्या परिस्थितीची जाणीव, स्वतःच्या गुण-अवगुणांची जाणीव, कृतज्ञता, इतरांबद्दल आदर, करुणा-अशा स्वरूपाचा आंतरिक विकासही या वयाच्या विकासाबरोबरीनंच घडेल. अशी आपली धारणा असते, अनेकदा भाबडी समजूतही असते.

मागं पाहिल्याप्रमाणं या ज्या गोष्टी आपण वयाच्या वाढीप्रमाणं तो अठराव्या किंवा पंचविसाव्या वर्षी करू शकेल, समजू शकेल असं गृहीत धरतो, त्या काही त्याच्या नैसर्गिक वाढीत अंतर्भूत असलेल्या गोष्टी नव्हेत. माणसाच्या शरीराची, अवयवांची, मेंदूची परिपूर्ण वाढ होणं, हे निसर्गानं पंचविसाव्या वर्षापर्यंत बरोबर होत असलं, तरी ज्या गोष्टींची अपेक्षा आपण बाळगतो आहोत, त्या गोष्टी शारीरिक नाहीत. आंतरिक आहेत, समजुतीच्या विकासाच्या आहेत, विचार-विवेकशक्तीच्या आहेत, मानसिक संतुलनाच्या आहेत. मनुष्याच्या बाबतीत त्या निसर्गानं गृहीत धरल्या आहेत, पण त्याची वाढ मात्र माणसावर सोपवली आहे. म्हणून त्या आंतरिक विकासासाठी योग्य वातावरण निर्माण करणं, ही जबाबदारीही पूर्णपणे माणसावर आहे. नुसतं

वय गृहीत धरून हा विकास होणार नाही ! त्यात पुन्हा वयाचे अवगुण चटकन लागण्याची अडचण आहे, ती वेगळीच.

त्यासाठी आपण इथं वर उल्लेखलेले गुण किंवा मागं उल्लेख केलेल्या जबाबदाऱ्या पेलण्यासाठी लागणारी क्षमता, विवेकशक्ती या गोष्टी त्याच्या ठिकाणी विकसित व्हायच्या असतील, तर त्याच्या घरापासून सर्वत्र या गुणांच्या विकासाला पोषक असं वातावरण लागेल, हे स्पष्ट आहे.

आंतरिक विकासाचं गणित खूप वेगळं आहे. शारीरिक विकास आपोआप होतो आहे. त्याला निश्चितता, समानता आहे, यातलं काहीच या आंतरिक विकासाच्या गणितात बसत नाही.

एक प्रामाणिकता घ्या. ती कामात आहे, त्याचं रास्त मूल्य घेण्यात आहे, व्यवहारात आहे, तो गुण दहा वेळा अनुभवायला यावा लागेल. त्याची स्वतःला झळ लागेल, पण समाधान राहील आणि इतरांना लाभ घडेल याची पक्की खात्री झाल्यावर हा गुण आंतरिक विकास घडवील. तेच क्षमेचं, जबाबदारीचं आहे. विकासाचे हे गुण बेरजेच्या गतीनं वाढतात. याउलट आंतरिक अवनती घडवणारे अवगुण गुणाकाराच्या गतीनं वाढतात ! त्यामुळं ते टाळण्यात अधिक सावधानता बाळगावी लागते. म्हणून खरा आंतरिक विकास वयावर नसून हे सारं समजून घेण्यावर आहे!

*

२३. निर्जिवाची मात

आपल्याला सगळीकडं वेगवेगळ्या कारणांनी संघर्ष चालू असलेले दिसतात. संघर्ष हा जीवनाचा अटळ भाग आहे, असंही बरेच लोक मानतात. खरंतर, संघर्ष इतका अटळ आहे, असंही नाही. संघर्षरहित जीवन जगणारे महात्मे आहेत, अगदी सामान्य माणसंही आहेत. मुळात लोभ, मत्सर, स्पर्धा, सत्तेची अभिलाषा-अशा अनेक कारणांनी हे संघर्ष उद्‌भवतात, असं आढळेल. या नकारात्मक गोष्टींनी माणूस संघर्षात सापडतो, हे जितकं खरं आहे, तितकंच त्याला आतून संघर्षाची थोडी आवड आहे. फारतर खुमखुमी म्हणा. आपण पाहिलं असेल की, आयुष्यात इतके संघर्ष असताना ते कमी पडतात म्हणून की काय, मुला-मुलांच्यातसुद्धा वेगवेगळे खेळ, अलीकडचे गेम्स, पाठलाग-अशा निमित्तांनीसुद्धा तो खेळातसुद्धा संघर्ष उभे करतो. तर्कसंगत विचार, बुद्धिप्रधान डावपेच अशा काही चांगल्या गोष्टी सोडल्या तर, बुद्धिबळातसुद्धा प्यादी, हत्ती, घोडे आणून प्रतिस्पर्धी उभे करून तो संघर्षाचा, मारामारीचा, मात करण्याचा आनंद एका बाजूला घेतोच.

वास्तविक, माणूस हा सृष्टीतला इतका प्रगत घटक आहे की, त्यानं ठरवलं तर त्याच्या साध्या अन्न, वस्त्र, निवारा यांसारख्या गरजांसाठीसुद्धा त्याला संघर्ष करावा लागणार नाही. अनेक पशु -पक्षी-

प्राण्यांना या समजुतीच्या अभावी तो करावा लागतो, हे आपण जरूर लक्षात घ्यावं. अनेक प्राण्यांना तर जगण्यासाठी संघर्ष आणि हत्या केल्याशिवाय पर्यायच नसतो. माणसाला शेतीची विद्या आणि वनस्पती यांच्या साहाय्यानं अगदी आनंदानं संघर्षरहित उत्तम जीवन जगता येतं. जगावंही. पण माणसानंच स्वतःच्या व निसर्गाच्या स्वास्थ्याची हानी आपल्या संघर्षांनी मांडलेली दिसते.

संघर्षाचाच प्रश्न असला, तर पशु काय किंवा माणूस काय या सजीवांनी काही कारणांनी एकमेकांशी संघर्ष केले, एकमेकांवर मात केली, तर ते वर म्हटलं तसं थोडं असमंजसपणाचं, बेसावधतेचं लक्षण ठरेल. तसे अनुभवही येतात.

पण माणसानं विचार करावा, असा एक संघर्ष तो स्वतः सर्व पातळ्यांवर करतो, तो मुळात त्याच्या नसलेल्या जमिनीच्या मालकीवरून. वास्तविक,जमीन निसर्गाचं-ईश्वराचं देणं, पण तिचा लोभ, सोस यांसाठी माणूस एकमेकांशी शाब्दिक संघर्षांपासून जिवावर उलटणारे संघर्ष करतो आहे. वर्षानुवर्षं कोर्टात पडून असलेले खटले या निर्जीव मातीच्या मालकीबद्दलचे आहेत !

माती, सोनं, वस्तू अशा अनेक निर्जिवांकडून नकळत माणसासारख्या सजीवावर मात व्हावी आणि माणसाला ते कळू नये, यापेक्षा दुर्दैव ते काय ?

*

२४. 'स्व'च्या ओळखीचा उपयोग

स्वास्थ्य असलं की, मनुष्य सहजपणे आनंदात असतो. जरा खोल पाहिलं तर, 'स्व' म्हणजे आपण खरे जसे आहोत, ते ओळखणं आणि 'स्थ' म्हणजे त्यात राहणं-यातून मनाची निर्माण होणारी जी स्थिती ती म्हणजे स्वास्थ्य.

'स्व' म्हणजे आपण जसे आहोत, ते ओळखणं, वेळ पडल्यास सांगणं, त्यानुसार वागणं, कामं करणं, काही वेळा न करणं - हे सगळं या खरं बोलण्यासारखं आहे. त्यामुळं खरंतर आनंद राहतो.

पण गंमत अशी आहे की, माणसाला असं खरं राहण्यापेक्षा जसं त्याला व्हावंसं वाटतं, तसं दाखवण्यात रस असतो. तसं दाखवल्यानं आपण इतरांवर प्रभाव टाकू शकू, मोठे ठरू, लोक आपल्याला मानतील- अशी त्याची समजूत असते. त्यापोटी तो जसा आहे तसा दिसण्यापेक्षा, वागण्यापेक्षा ज्याला लोक चांगलं म्हणतील, नावाजतील तसं राहण्याचा प्रयत्न करतो. त्यात अर्थातच त्याला खोटं वागावं लागतं, दिसावं लागतं, बोलावं लागतं.

म्हणजे असं पाहू की, मी गोरा नाही. तर तसं समजून घेणं, राहाणं, वागणं, सांगणं हे खरं बोलण्यासारखं आहे. त्यानं स्वास्थ्य येतं. एकवेळ इतरांशी तुलना केली, तर आपण त्या गोरेपणात कदाचित कमी पडलेले दिसू, इतर कोणी तसल्या गोष्टीसाठी आपलं

कौतुक करणार नाही, हे घडेल पण ते स्वीकारणं अवघड वाटल्यानं मनुष्य हे नसलेलं गोरेपण आणण्यासाठी पावडर लावील, इतर सौंदर्य प्रसाधनं करील, अगदी टोकाला जाऊन कुठले वैद्यकीय उपचार करील, पण ते सारं या खोटं बोलण्यासारखं असल्यामुळं म्हणजे 'स्व'चं खरं स्वरूप नसल्यामुळं, कधीतरी ते लक्षात येईल, कुणाला तरी ते कळेल, कुणीतरी शोधून काढेल - मग मात्र दुःख वाट्याला येईल. तेव्हा असं आढळेल की, त्यापेक्षा आपण जसे काही, गोरे, निमगोरे किंवा काळसर असू तशा 'स्व' चा स्वीकार करणं आणि लोकांनी तसं म्हटलं, तरी मान्य करणं यात दुःख नक्कीच कमी आहे.

खरं पाहिलं, तर या 'स्व' चं जे खरं स्वरूप आहे, त्याच्या बाह्यांगाचा एक भाग म्हणजे हा काळे-गोरेपणा. तो तसा 'स्व' चा विचार करता खूप कमी महत्त्वाचा आहे. माणूस म्हणून त्याचं व्यक्तिमत्त्व, त्याच्या कुवती, तो स्वतःसाठी व जगासाठी करू शकत असलेल्या गोष्टी, आयुष्याचं सार्थक करणं - याचा या बाह्यांगाशी काही संबंध नाही. त्याला जे जे करता येणं शक्य आहे, ते सारं या स्वतःचं खरं स्वरूप जाणण्यावर, त्यानुसार वागण्यावर अवलंबून आहे. त्यावर स्वास्थ्य अवलंबून आहे.

त्यासाठी गरज आहे, ती या 'स्व'ची खरी ओळख करून घेण्याची !

*

२५. दुःखाच्या सोबतीचा स्वीकार

आपलं स्वास्थ्य टिकण्यासाठी ज्या अनेक गोष्टी समजून घेण्याची आणि स्वीकार करण्याची गरज आहे, त्यातली एक गोष्ट म्हणजे दुःख !

सुखात स्वास्थ्य असतं, ते उघड असतं. त्याकडं वेगळं लक्ष द्यावंही लागत नाही. कुठल्या तरी कारणांनी त्या सुखात खंड पडला, दुःख वाट्याला आलं, म्हणजे मग सुखदुःखाचा विचार मनुष्य करू लागतो. सुखात असो, दुःखात असो हा विचार आधीपासूनच करण्याची खरी गरज आहे. कारण तसं सुखही अपरिहार्य आहे आणि दुःखही.

वाट्याला येणाऱ्या सुखाच्या आणि दुःखाच्या प्रमाणात प्रत्येकाच्या आयुष्यात काही फरक असतो. पण केवळ सुखमय किंवा केवळ दुःखमय असं आयुष्य सहसा नसतं, असलंच तर अपवाद समजावा.

मनुष्य स्वतःच्या योग्य प्रयत्नांनी, विवेकानं, मार्गदर्शनानं यातल्या सुखाचं प्रमाण वाढवू शकतो. पण त्यामुळं दुःख नाहीसं होतं, असं घडत नाही. ते कुठल्या रूपानं आणि कधी समोर उभं राहील, हे सांगता येत नाही.

दुःख गरीब-श्रीमंत,राजा-रंक, स्त्री-पुरुष, लहानथोर-असले भेद जाणत नाही. त्या त्या पातळीवर येणाऱ्या दुःखाचं स्वरूप फारतर वेगळं असतं. गरीबीचं, हलाखीचं

जीवन जगण्यातलं दुःख दूर करण्यासाठी उत्तम शिक्षण घेण्याचे, एखादा उद्योग किंवा कारागिरी शिकण्याचे, कसून प्रयत्न करणं आणि त्यात यशस्वी होऊन पैसा कमवून ते दारिद्र्याचं दुःख दूर करणं शक्य आहे, आपण ते करतोही.

हे सारं तर रास्तच आहे. दुःख दूर करण्याचे प्रयत्नही योग्यच आहेत. फक्त लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट ही आहे की, दुःखाचे प्रकार अगणित आहेत. एखादं आजारपण, नातेवाईक दुरावणं, व्यवहारात फसवणूक होणं, अपघात वाट्याला येणं, आवश्यक वस्तूंची टंचाई उत्पन्न होणं, अपयश येणं, व्यापारात खोट येणं, नोकरीत अचानक काही आरोप वाट्याला येणं, त्यानं नोकरी गमावणं, रास्त असलेली बढती न मिळणं, वाईट संगत लागून नुकसान होणं, व्यसन लागणं, अवकाळी पावसानं शेतीची नुकसानं होणं, बाजारभाव गडगडणं, अपमान सहन करायला लागणं, कुणी विक्षिप्तपणे - तऱ्हेवाईकपणे वागणं, ऐनवेळी कुणी धोका देणं, चोरी होणं, दरोडा पडणं, जवळच्या प्रिय पण लहान व्यक्तींचे अपमृत्यू पहावे लागणं - अशी ही दुःखांची यादी न संपणारी आहे. सुखांच्या सोबतीला कुठलं तरी दुःख ठेवलेलं असतं.

दुःखाच्या सोबतीचा हा स्वीकार एकदा केलेला असेल, तर अशावेळी आपलं स्वास्थ्य जाणार नाही !

*

२६. पूर्णतेच्या प्रयत्नांची मर्यादा

आपलं स्वास्थ्य टिकण्यासाठी ज्या अनेक गोष्टी समजून घेण्याची आणि स्वीकार करण्याची गरज आहे, त्यातली दुसरी गोष्ट म्हणजे अपूर्णता !

माणसाला स्वास्थ्य किंवा समाधान मिळतं, ते पूर्णतेमुळं, हे खरं. जितकी पूर्णता जास्त होत जाईल, तेवढं त्याचं समाधान वाढतं आणि ती ती गोष्ट पूर्ण झाल्यावर त्याचं समाधानही पूर्ण होतं.

फक्त यात एक फरक आहे की, प्रापंचिक माणसाचा विचार केला, तर त्याच्या दृष्टीनं जेवणखाण, घरदार, कार्यक्रम, समारंभ - अशा अनेक गोष्टी त्याच्या वाट्याला येत असतात. त्या त्या गोष्टी आपापल्या परीनं पूर्ण होण्यात त्याला समाधान मिळतं. म्हणून त्यात कुठली अपूर्णता राहू नये, यासाठी तो अपरंपार कष्ट घेत असतो. साधं जेवण जरी झालं, तरी त्यात चार पदार्थ असावेत, असलेल्या पदार्थात चव पूर्ण असावी, कुठं तिखट-मीठ कमी जास्त पडू नये. पदार्थसुद्धा पोट पूर्ण भरेल, इतपत असावेत. ते घेण्याएवढा वेळ त्याला मिळावा, अशा अनेक गोष्टींची तो काळजी घेतो. ही रोजची गोष्ट असूनही ती अशा पद्धतीनं पूर्ण होते, असा अनुभव क्वचितच येतो. पदार्थाला चव कमी पडू नये, म्हणून काळजी घेतली, तर तो छान होतो. पण छान झाल्यामुळं सगळ्यांना आवडतो आणि कमी

पडतो ! कमी पडू नये म्हणून काळजी घेतली, तर चवीत काहीतरी कमीजास्त होऊन तो कमी न पडता शिल्लक राहतो ! असा हा माणसाचा पूर्णतेचा कार्यक्रम असंख्य बाबतीत रोज सुरू असतो आणि तो किती प्रयत्न केले तरी, कुठल्यातरी बाबतीत अपूर्ण राहून रोज संपत असतो.

कधी कामांना दिवस पुरत नाही, कधी दिवसाला काम पुरत नाही. कधी वस्तूंना पैसा पुरत नाही, कधी पैशानं काय आणावं, त्याला वस्तू पुरत नाहीत. असं काहीना काही अपुरं राहात असतं. पण इतकी वर्षं याचा अनुभव घेऊनसुद्धा हा प्रपंचाचा स्वभाव आहे, हे लक्षात येत नाही. ते लक्षात न आल्यामुळं प्रत्येक वेळी त्या त्या राहिलेल्या गोष्टींमुळं, अपुऱ्या पडलेल्या गोष्टींमुळं-अपूर्णतेमुळं अस्वास्थ्य येतं.

हे सततचं अस्वास्थ्य स्वतःलाच नव्हे, तर इतरांनाही त्रास उत्पन्न करीत असतं. त्यावर एक मूलभूत गोष्ट ओळखण्याची आणि स्वीकारण्याची खरी गरज आहे की, प्रपंचात पूर्णतेचे प्रयत्न एवढाच अपूर्णतेवरचा उपाय आहे आणि तो अपूर्ण आहे. दरवेळेला फक्त काय अपुरं पडलं, ते पहाण्याचा आनंद घ्यावा !

हे एकदा समजलं आणि स्वीकारलं की, आपल्या प्रपंचातलं स्वतःचं आणि इतरांचं अस्वास्थ्य दूर होईल !

*

२७. स्वप्न : उपयोग व उपद्रव

आपलं स्वास्थ्य टिकण्यासाठी ज्या अनेक गोष्टी समजून घेण्याची आणि स्वीकार करण्याची गरज आहे, त्यातली आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे स्वप्नांचा उपयोग आणि उपद्रव !

स्वप्न पाहण्याच्या शक्तीचा उपयोग एखाद्या ध्येयासारखा केला, तर माणसाच्या आयुष्याला वळण मिळून तो जीवनात काही स्थान निर्माण करू शकतो. स्वप्नांचा उपयोग होतो. पण आपली कुवत न ओळखता इतर कुणाशी तरी तुलना करून आपल्या आटोक्याबाहेरची स्वप्नं पाहायला लागलं, तसं वागायला लागलं, तर मात्र ती स्वप्नं स्वप्नंच राहतात, अपेक्षाभंगही होतात आणि मिळण्यासारखं असलेलं स्वास्थ्यही गमावलं जातं. मग स्वप्नं उपद्रव ठरतात.

रास्त स्वप्नं पाहण्याच्या विद्येमुळंच कुणी यशस्वी उद्योजक ठरतो, कुणी कलेमुळं रंगमंचावर येतो, प्रसिद्धीच्या झोतात वावरतो, तर कुणी आपल्या रंगरूपावर छोट्यामोठ्या पडद्यावर बाजी मारून जातो. कधी कुणा उस्तादांची मैफल अभूतपूर्व ठरते.

अशा असंख्य गोष्टी आजूबाजूला घडताना आपल्याला दिसतात, कळतात. त्यात एक आनंद असतो, पाहण्यात प्रेरणा असते. पण त्याला तेवढंच महत्त्व असतं. आपण स्वतःला रंगमंचावर किंवा पडद्यावर

स्वप्नात दिसू लागणं, हे स्वप्न म्हणून ठीक असतं, पण त्यासाठी लागणाऱ्या त्या त्या बाबतीतल्या गुणांची जोड सहसा सर्वांकडं नसते. ज्याला असते, त्याचं ते स्वप्न उपयोगी असतं. पण इतरांना मात्र थोड्याफार काळानंतर निराशा येते, अन्याय वाटतो, अशी अवाजवी स्वप्नं अर्थातच उपद्रवी ठरतात.

याला आणखी एक बाजू आहे. ती अशी की, यशाच्या वेगवेगळ्या शिखरावर असलेली माणसं सतत खूपच आनंदात वावरत असतील, असं वाटून क्षणभर त्यांचा हेवाही वाटतो. वस्तुस्थिती मात्र अशी असतेच, असं नाही. इथंही पुन्हा स्वप्नांच्या उपयोगाचा आणि उपद्रवाचा खेळ चालू असतो, हे समजून घेतलेलं बरं. कुणा खेळाडूला गायक व्हायचं असतं, कुणा गायकाला उद्योजक व्हायचं असतं, कुणा उद्योजकाला सिनेमात जायचं असतं. पण त्यासाठी लागणारे गुण किंवा अनुकूलता त्यांच्याकडं नसल्यानं त्याची खंत एखादा पुरस्कार स्वीकारतानाही ते व्यक्त करीत असतात. अनेक मोठ्या माणसांना तर सामान्य माणूस व्हायचं असतं! प्रसिद्धीच्या वलयापुढं त्यांना सामान्य जीवन हेसुद्धा एक स्वप्न ठरतं ! म्हणून स्वप्नांची शक्ती माणसाला दिलेली आहेच पण ती जर प्रगतीला किंवा स्वास्थ्याला उपयोगी पडायची असली, तर तिची नीट ओळख असावी !

*

२८. भेद : ओळख व स्थान

स्वास्थ्यासाठी ज्या अनेक गोष्टी आयुष्यात लवकर शिकाव्या व स्वीकाराव्या अशा आहेत, त्यातली आणखी एक गोष्ट म्हणजे द्वंद्व किंवा भेद .

श्रेष्ठ-कनिष्ठ, गरीब-श्रीमंत, कमी-जास्त असे अनेक प्रकारचे भेद आपल्याला रोज आढळत असतात. राजा-प्रजा, स्त्री-पुरुष, सजीव-निर्जीव, सबळ-दुर्बळ अशीही अनेक द्वंद्व आपण अनुभवीत असतो. आपल्याला हेही आढळतं की, याचा गैरफायदा घेऊन जो कमी, दुर्बळ इत्यादी आहे, त्याच्यावर अनेकदा अन्याय होतो. त्याची पिळवणूक होते, त्याला लुबाडलं जातं.

आपल्या असं लक्षात येईल की, यातले अनेक भेद किंवा द्वंद्व ही निसर्गानंच निर्माण केलेली आहेत. काही माणसानं. निसर्गानं निर्माण केलेल्या भेदांमध्ये एक व्यवस्थेची दृष्टी असते. उंच डोंगरांची जेवढी गरज वेगवेगळ्या कारणांसाठी असते, तेवढीच खोल दऱ्यांची, तलावांची गरजही वेगवेगळ्या कारणांसाठी असते. जितकी कडक उन्हाची गरज तितकीच कोसळणाऱ्या पावसाचीही गरज. या गोष्टी विरोधी वाटल्या, भेदाच्या वाटल्या तरी त्या पूरक असतात. जसं स्त्री-पुरुष हे द्वंद्व बहुतांशी सजीवांमध्ये आढळून येतं आणि जरी त्यात भेद दिसत असला, तरी सृष्टीच्या व्यवस्थेचा तो एक भाग आहे. त्यानं या

निसर्गाचा प्रवास सुरू ठेवला आहे.

अर्थातच हे भेद, द्वंद्व समजून घेणं किंवा त्यामुळं निर्माण होणारी असमता समजून घेणं म्हणजे तिच्या साहाय्यानं कुणावर अन्याय करणं, फायदा घेणं याचं समर्थन करणं नव्हे.

निसर्गाच्या व्यवस्थेत कमी-जास्त, उंच-सखल यांना स्थानही आहे, त्यांना कार्यकारणही आहे, त्यांचा उपयोग आहे आणि त्यावरून त्यांच्यात काही भेदभाव निसर्ग करीत नाही. भेद समजून घेणं वेगळं आणि त्याच्या आधारानं भेदभाव करणं किंवा त्याचं समर्थन करणं वेगळं.

काही मूलभूत भेद हे निसर्गाच्या आणि माणसाच्या व्यवस्था चालण्यासाठी अपरिहार्यच आहेत. निसर्ग डोंगराला मोठं समजत नाही, तळ्याला निरुपयोगी समजत नाही. दोन्हींचा उपयोग आहे, दोन्हींना स्थान आहे. अडचण इथं आहे की, मनुष्य हे भेद, त्यामधली व्यवस्था, लक्षात न घेता भेदभाव करतो, तशी वागणूक देतो, ते चुकीचं आहे. याउलट दुसऱ्या टोकाला जाऊन तो वरवरची समानता आणायला जातो, तेही चुकीचं आहे. कारण ते या व्यवस्थेत शक्य नाही. समानता आणण्यातही समजूत हवीच. हे समजलं नाही, तरीही स्वास्थ्य जातं.

म्हणून गरज आहे ती भेद, समानता नीट समजण्याची आणि भेदभाव न करण्याची !

*

२९. निसर्गाचा एक न्याय

आपला अनेक क्षेत्रांतल्या अनेक माणसांशी विविध कारणांनी संबंध येतो. काहींचा जवळून येतो, काहींना आपण दुरून ओळखतो, तर काहींना फक्त वृत्तपत्रात किंवा पडद्यावरच पाहतो.

आपले नातेवाईक, मित्र, ओळखीच्या व्यक्ती पाहिल्या तर कुणाकडं भरपूर शेतीवाडी, कुणाला भरपूर पगार, कुणी मोठ्या हुद्दयावर. कुणाची मुलं राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय पातळीवरच्या परीक्षांत चमकतात. कुणाची व्यक्तिमत्त्व भारदस्त, कुणी रूपवान. कुणी कुठल्या कलेत तरबेज, कुणाचा स्वयंपाकात हातखंडा, कुणाचं वक्तृत्व ऐकत राहावं असं, कुणी मोठ्या घराण्यातले म्हणून प्रसिद्ध असतात.

असं पाहिलं की, त्या त्या गोष्टीचं कौतुक वाटण्याबरोबरच का कुणास ठाऊक, नकळत आपल्या प्रपंचाची किंवा स्वतःतल्या उणिवांची जाणीव माणसाला अस्वस्थ करते. वास्तविक, कुणाची मुलं कुठल्या परीक्षेत चमकली असतील, तर तो मोकळ्या मनानं अभिनंदन करण्याचा विषय असतो. आपला मुलगा त्यात चमकला नाही किंवा त्याची ती कुवत नाही किंवा आमच्याकडं ते वातावरणच नाही, या विचारांचा खरंतर त्या यशाशी काही संबंध नसतो. पण मन मात्र तो संबंध नकळत जोडून एका चांगल्या घडलेल्या गोष्टीतून आनंद घेण्याऐवजी

माणसाला दुःखात, अस्वास्थ्यात टाकतं.

हे तर बरोबरीच्या लोकांचं झालं. मोठ्या माणसांच्या गोष्टी मोठ्या असतात. ते पडद्यावर चमकतात, सह्या घेण्यासाठी लोक तुटून पडलेले असतात, सत्ताधीश सैन्याची मानवंदना स्वीकारतात, कुणी नटनट्या स्वप्नवत जगतात. त्यांच्या बड्या वाहनांची नुसती नावंच ऐकायला मिळतात. या माणसांच्यामधली आणि आपल्यातली तफावत आपल्याला माहीत असली, तरी मनुष्य अस्वस्थ होतोच.

वस्तुस्थिती अशी असते की, जे हे मोठं, मिरवण्यासारखं, प्रसिद्ध असं असतं, त्याबरोबर त्यांच्या आयुष्यात इतर किती उणिवा असतात, याची आपल्याला सुतराम कल्पनाही नसते. मूलबाळ नसणं, नाती दुरावणं, कोर्टाचा ससेमिरा मागं असणं, घटस्फोट होणं, अपंग संतती असणं, व्यसनानं ग्रासलेलं असणं, विलक्षण एकाकी असणं-अशा अगणित गोष्टींची किनार या वर दिसणाऱ्या यशाला असते. हे कळलं तर एखादी गोष्ट नसल्याचं दुःख होणार नाही उलट असलेल्या गोष्टीकडं लक्ष जाईल. इतरांकडं बघून अस्वास्थ्य येणार नाही.

कारण निसर्गात एक असा न्याय आहे की, तो सर्वांना सर्वच देत नाही, दिलेल्या गोष्टीच्या मागं न दिलेलं उभं असतं आणि न दिलेल्या मागं दिलेलं उभं असतं, फक्त हे लक्षात यावं लागतं !

*

३०. अंतरं : वास्तव व उपाय

आपण स्थिर स्वरूपाच्या दोन वस्तू, भौगोलिक अंतरावरची दोन गावं-यांचा विचार करतो, तेव्हा त्यांमध्ये काही वेळा काही फुटांचं, काही मैलांचं अंतर निश्चितपणे कळतं, ते समजून घ्यावं लागतं. एका गावापासून दुसरं गाव शंभर मैलांवर असेल, तर ते अजून दहा वर्षांनी काय किंवा वीस वर्षांनी काय, ते तेवढ्याच अंतरावर असतं.

हे समजायला सोपं वाटतं. पूर्वीच्या काळी अशा अंतरावर पोचायला पाच-सहा दिवस लागत असतील, तर वाहतुकीची साधनं अधिक वेगवान होत जातील, त्या प्रमाणात हाच पोचण्याचा वेळ कदाचित पाच-सहा दिवसांवरून पाच-सहा तासांवर येईल. पुढं त्याहीपेक्षा कमीही. पण आपण एक लक्षात ठेवून असतो की, हा वेळ कितीही कमी आला, तरी त्यात मूळ गावं जवळ येत नाहीत, त्यांतलं अंतर बदलत नाही. एक गाव म्हणजे दुसरं गाव होत नाही. फक्त पोचण्यातल्या जलद गतीमुळं कामं किंवा गावागावांतला संवाद वाढू शकेल.

हे जसं आपण समजून घेतो, तसंच खरं वडील-मुलगा, सासू-सून, संस्थापक मालक आणि आजचा तरुण कामगार- अशा अनेक बाबतीत असं दोन गावांसारखं एक मूलभूत अंतर असतं. त्यांतलं वयाचं जे अंतर असतं, ते काळाचं आणि त्यामुळं दोन गावांतल्या भौगोलिक अंतरासारखं

असतं आणि ते कायमच तसं राहातं. एखाद्या पंचवीस-तीस मैलांवरच्या दोन गावांतलं अंतर जसं बदलत नाही, तसंच पंचवीस-तीस वर्षांनी आलेल्या दुसऱ्या पिढीतलं आणि पहिल्या पिढीतलं हे पंचवीस-तीस वर्षांचं अंतरही बदलत नाही. पण या भौगोलिक अंतराला जशी दळणवळणाची अधिक प्रभावी साधनं शोधून काढणं, टेलिफोन, बिनतारी यंत्र, आताचं अधिक जलद असलेलं नेटवर्किंग-या मार्गांनी त्या दोन गावांतला संवाद, समस्यांची-उपयांची देवघेव, मदत, माहिती या मार्गांनी संवाद वाढवता येतो. हे भौगोलिक अंतर असूनही या साधनांनी त्या अंतरामुळं निर्माण होणारी दरी, अडचणी, संपर्काचा-संवादाचा अभाव-अशा अनेक गोष्टींवर मात करता येते, तशीच ती या मानवी वयातल्या अंतरावरही करता येते, हे लक्षात घेणं मात्र थोडं अवघड वाटतं. वडील-मुलात पिढीचं अंतर असणारच, सासू-सुनेत वयाचं अंतर असणारच आणि त्यामुळं त्यांच्यात विसंवाद, मतभेद, मदत-सहानुभूती यांचा अभाव असणारच-हे जे गृहीत धरलं जातं ते मात्र फोल आहे, हे आपल्या लक्षात येईल. भौगोलिक अंतरं जशी संपर्काच्या साधनांनी मिटवता आली, तशी वयाची-पिढ्यांची अंतरं मनांच्या योग्य भूमिकेनं मिटवता येतात. फक्त त्यासाठी तयारी हवी ती या विचारांची आणि त्याला साथ देणाऱ्या मनाची !

*

३१. बदल : सुख आणि दुःख

एखादं ऑफिस-कार्यालय-यंत्रणा व्यवस्थित चाललेली असते. वातावरण खेळीमेळीचं असतं. अचानक आदेश येतो की, त्याचे व्यवस्थापक बदलून कुणी नवीन येत आहेत. मुख्य माणूस बदलून जाणार आणि त्यामुळं आता हे वातावरण टिकणार नाही, अशा चर्चा सुरू होतात. त्यातून येणाऱ्या माणसाची कुंडली पुढं पोचतच असते. तो जर स्वभावानं रागीट, तुसडा, कडक असेल तर त्याला कसं सामोरं जावं, याच्या विचारात अनेकांचा वेळ जातो. प्रत्यक्षात बदलानंतर असा अनुभव येतो की, आपण समजत होतो तसं एवढं काहीच झालं नाही. उलट आधीच्या व्यवस्थेतले अनेक दोष, ढिलाई दूर झाली. निर्णय पटपट व्हायला लागले. ग्राहकांचा प्रतिसाद वाढला. यंत्रणा अधिक कार्यक्षमपणे चालायला लागल्या. काही चुकीच्या प्रथा बंद झाल्या.

याउलट एखाद्या बदलाच्या वेळेला चांगलं वातावरण निर्माण होईल, असं आपल्याला वाटतं. पण त्यावेळी वेगळाही अनुभव येतो. वातावरणातला सुसंवाद, कार्यक्षमता कमी होतात. वेळी विसंवाद उद्‌भवतात. हे असंच चालू असतं. त्याचं कारण आपण त्या त्या वेळी आधीपासूनच बाळगलेल्या वेगवेगळ्या अपेक्षा असतात.

हे जसं बदलांचं चक्र ऑफिस-यंत्रणा यांमध्ये सुरू असतं, तसंच ते अशा अगणित

ठिकाणी सुरू असतं. निसर्ग बदलतो, हवामान बदलतं, रस्ते, वाटा, नदीची पात्रं असंख्य गोष्टी बदलतात. घरातही माणसांचं येणं-जाणं, नवे जोडले जाणं, जुन्यांचं येणं-जाणं कमीजास्त होणं, काही दुरावणं, काही जवळ येणं, कुणी निधनानं कायमचं दुरावणं, तर कुणी जीव घरात नव्यानं दाखल होऊन घरच्या साऱ्या वातावरणातच एकदम विधायक बदल होणं, घरात एकमेकांची कामं, जबाबदाऱ्या यांच्यात बदल होणं-असे असंख्य बदल सतत होत असतात.

त्यानुसार आपल्या जेवणा खाणाच्या, झोपेच्या, कामांच्या वेळा यांतही बदल घडत असतात. हे बदल काहींना त्या त्या वेळी सुखावह ठरतात, तर काहींना थोडे त्रासाचे वाटतात. त्यानुसार त्यांच्या स्वास्थ्यावरही परिणाम होत असतो. त्यांचा स्वभाव तसा असेल, तर ते इतरांचंही स्वास्थ्य त्यामुळं घालवतात. एक नक्की असतं की, यातला कुठलाच बदल कायमचा नसतो, तो कधीच कुणाला नेहमी सुखाचा किंवा नेहमी दुःखाचा असा नसतो.

हे एकदा लक्षात आलं की, बदलांकडं बघण्याची दृष्टीच बदलते. ते बदल त्याक्षणी सुखाचे वाटोत किंवा दुःखाचे वाटोत. कारण ती सुख-दुःख सापेक्ष असतात, पुन्हा बदलणारी असतात आणि मुळात बदल हा कधी सुखाचा किंवा दुःखाचा नसतो, तर ते या जगातलं एक वास्तव असतं !

*

३२. भविष्याची चाहूल

निसर्गानं दिलेल्या अनेक शक्ती माणसाकडं आहेत. त्यांत स्वतःच्या रक्षणासाठी प्राण्यांकडंसुद्धा आवाजाची किंवा वासाची तर काहींना दृष्टीची शक्ती दिली आहे. त्यानं तो भविष्यातलं संकट ओळखू शकतो. त्यासाठी आधीच उपाययोजना करून जिवावरचं संकटसुद्धा टाळू शकतो. माणसाच्या ठिकाणी तर या साऱ्यापेक्षाही जास्त तीव्र शक्ती आहेत.

माणसाला स्थलकालाचं भान असल्यामुळं मागच्या घटनांची आठवण, आकलन यांचा उपयोग तो करू शकतो. भविष्यकाळाची कल्पना आणि त्याचा वेधही तो घेऊ शकतो. महत्त्वाचे दोन फरक या क्षमतांच्या बाबतीत माणसात आणि पशूत आहेत. ते म्हणजे पशू फक्त त्यांचा महत्त्वाचा उपयोग संरक्षण किंवा आपला जीव वाचवणं या कामी करतात.

माणसाला मात्र संस्कृती, समाधान, ईश्वर, सूक्ष्म जग-अशा अगणित गोष्टींचा वेध घेण्याची क्षमता आहे. त्यामुळं भविष्यातल्या धोक्याची चाहूल तर त्याला लागू शकतेच पण त्याचं हे जे समृद्ध, आनंदी जग आहे, त्या बाबतीतल्या धोक्यांची कल्पनाही त्याला येऊ शकते. आवश्यक कृती करून ते धोकेही तो टाळू शकतो.

हा विचार अशासाठी करायचा की, मुळातच हे सारं तो ज्या 'विचारशक्ती'नं करू

शकतो, ती गमावण्याचा निर्माण झालेला धोका तरी तो आज ओळखतो आहे की नाही, याबद्दल शंका आहे. एका बाजूला यंत्रं त्याच्या अनेक क्षमता निकामी करत चालली आहेत. वाहनांनी पायांची शक्ती गेली, यंत्रांनी हातांची गेली, संगणकाच्या पडद्यांनी डोळ्यांची गेली, अति बैठ्या कामानं शरीरस्वास्थ्याची गेली, जीवघेणे आजार त्याच्या शरीरात ठाण मांडून बसले आहेत.

दुसऱ्या बाजूला यंत्रांच्या वापरामुळं लेखनशक्ती संपली, साधी सही संपली, सॉफ्टवेअर्सनी तर चित्रकलेपासून अनेक कला संपल्या, पाठांतर संपलं, गणित गेलं, रेकॉर्डिंगनं रियाज गेले, साधी बेरीज, गुणाकार, भागाकार करण्याची क्षमता गेली. मेमरीच्या असंख्य साधनांनी स्वतःचा साधा फोन नंबर सांगण्या इतपत स्मरणशक्तीही राहिली नाही. सुखसाधनांनी माणसाला माणसाची गरज उरली नाही.

याच मार्गानं अशाच वेगानं विचार न करता आपण जात राहिलो, आपल्या शारीरिक आणि मेंदूच्या क्षमता संपत गेल्या, तर माणूस-माणुसकी सोडाच पण संगणकापेक्षाही कृत्रिम आणि पशूपेक्षाही हीन जीवन आपल्या वाट्याला येईल, या भविष्याची चाहूल निदान जाणकारांना, देवत्वाची ओढ असलेल्यांना लागो आणि त्याची योग्य ती दखल ते घेवोत, एवढीच तळमळीची प्रार्थना !

*

शि
दो
री
•

डॉ. सुहास पेठे यांच्या दर्जेदार व संग्राह्य साहित्याची सूची
(आता डिजिटल स्वरूपात)

१. अध्याय नववा : समओवी

२. हरिपाठपराग

३. दर्शन

४. कर्तव्याची सश्रद्ध पाऊलवाट

५. साधनपदावली

६. जपसंकल्प

७. अभंगसाधना

८. जाग

९. जीवनजिज्ञासा

१०. विचारविश्वाची ओळख

११. चैतन्यचिंतन

१२. किमया

१३. प्रसादकण

१४. ठेवा

१५. संतबोध : भाग १

१६. संतबोध : भाग २

१७. संतबोध : भाग ३

शि
दो
री

१८. वृत्त्यंतरप्रकाश

१९. नाम

२०. श्री विष्णुसहस्रनाम

२१. चिंतनक्षण ू (एकत्रित आवृत्ती)

२२. उपासनेची नोंदवही

२३. उत्तरायण - भाग १

२४. शोध

२५. दिशा

२६. उत्तरायण - भाग २

२७. मुलांच्या गोष्टी पण सर्वांच्यासाठी

२८. बासरी

२९. उपासना

३०. अध्याय बारावा : समओवी

३१. कृपापदावली भाग : १

३२. कृपापदावली भाग : २

३३. साधनपदावली भाग १

३४. सारविस्तार भाग : १

३५. साधनप्रेरणा
३६. मेरी यात्रा (हिंदी)
३७. बोधपाठ
३८. एकाध्यायी विचारगीता
३९. सृष्टिसंदेश
४०. गुरुतत्त्वतरंगिणी
४१.समओवी पारायणप्रत
४२. नाम (इंग्रजी आवृत्ती)
४३ ते ५४. चिंतनक्षण : भाग १ ते १२ (स्वतंत्र छोटी पुस्तके)
५५. शिदोरी
५६. विचारविसावा
५७. सारविस्तार भाग २
५८. महाराजांची शाळा
५९. साधनपदावली भाग २
६०. आरतीपुष्पमाला
६१. विनवणीची वाणी
६२. श्रद्धेची पहाट
६३. उपासनामाला

शि
दो
री
•

६४. पावनपथ

६५. अनुभवपुष्पे - भाग १

६६. कृतज्ञतामार्ग

६७. ज्ञानेश्वरीच्या प्रकाशात

६८. श्री ज्ञानेश्वरी अध्याय नववा : समओवी : (मोठ्या आकारातील विशेष आवृत्ती)

६९. संतबोध : भाग ४

७०. श्री रमणमहर्षीकृत उपदेशसार

७१. उत्तरायण -भाग ३

७२. अनुभवपुष्पे - भाग २

७३. श्रद्धा

७४. अनुभवपुष्पे - भाग ३

७५. अर्घ्य

७६. जीवनचिंतन

७७. स्वास्थ्यसंवाद

७८. वचनांजली भाग १

७९. अक्षरायण

८०. वचनांजली भाग २

८१. भावगीता

***

.....याच मार्गानं, अशाच वेगानं, विचार न करता आपण जात राहिलो, तर आपल्या शारीरिक आणि मेंदूच्या क्षमता संपत जाण्याचा धोका आहे. तो वैयक्तिकही आहे आणि सामाजिकही आहे. मग माणूस किंवा माणुसकी या गोष्टी सोडाच पण आपल्या वाट्याला आपणच निर्माण केलेल्या निर्बुद्ध संगणकाचं किंवा अप्रगत पशूचं जीवन येईल, या भविष्याची चाहूल निदान जाणकारांना किंवा देवत्वाची ओढ असलेल्यांना लागो आणि त्याची योग्य ती दखल ते घेवोत, या विचाराला प्रवृत्त करण्याच्या नम्र हेतूनं ही अत्यल्प शिदोरी ....!